७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

बुधवार, दि. २४ जून २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १७९ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये


# महाराष्ट्राचा 'महा एआय' उपक्रम देशात ठरणार अभिनव

## मुख्यमंत्री : शासकीय कामात येणार गती आणि पारदर्शकता : राज्यातील विभागांत लवकरच अंमलबजावणी

मुंबई (दै. संध्या)



राज्य शासनाच्या विभागांमधील कामकाज अधिक कार्यक्षम, सुरक्षित आणि लोकाभिमुख करण्यासाठी 'महा एआय' - प्रगत कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी 'महाराष्ट्र हब' हा कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित देशातील पहिलाच अभिनव उपक्रम विकसित करण्यात आला असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. लवकरच या उपक्रमाची अंमलबजावणी राज्यातील विविध विभागात होणार असून या माध्यमातून शासकीय कामकाजातील पत्रव्यवहार, टिपण्या, अहवाल तयार करणे, शासकीय कामांचे भाषांतर, दस्तऐवजांचे सारांश तसेच शासकीय ज्ञानभांडारातील माहिती शोधणे यांसारखी कामे अधिक वेगाने आणि अचूकपणे करता येणार असल्याचेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. विधानभवन येथे महा एआय प्लॅटफॉर्मबाबत बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, अपर मुख्य सचिव असीम कुमार गुप्ता,वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, प्रधान सचिव नवीन सोना, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह, महाआयटीच्या संचालक भुवनेश्वरी एस,राज्य सूचना माहिती अधिकारी व उपमहासंचालक सपना कपूर यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यातील शासकीय यंत्रणेला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत प्रशासन अधिक परिणामकारक करण्यासाठी 'महा एआय' महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राने महाराष्ट्रासाठी ही प्रणाली विकसित केली असून ती इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागामार्फत उपलब्ध करून देण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य डेटा सेंटरच्या पायाभूत सुविधांवर कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यामुळे शासकीय माहितीचे सार्वभौमत्व, गोपनीयता व सुरक्षितता सुनिश्चित होणार आहे.

सर्व संवेदनशील शासकीय माहिती शासनाच्या स्वतःच्या नियंत्रणाखाली राहणार असून, माहितीची साठवणूक व प्रक्रिया राज्य शासनाच्या सुरक्षित अधोसंरचनेमध्येच केली जाणार आहे. 'महा एआय" प्रणालीद्वारे अधिकृत पत्रे, ई-मेल, टिपण्या तयार करणे, दस्तऐवजांचे संक्षिप्तीकरण, स्पष्टीकरण व भाषांतर, शासकीय नियम, अधिनियम, शासन निर्णय आणि परिपत्रकांवरील संदर्भाधारित माहिती शोधणे तसेच नैसर्गिक भाषेत अहवाल तयार करणे शक्य होणार आहे. लाभार्थ्यांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने लाभार्थी पडताळणीची सुविधाही उपलब्ध होणार आहे. सदर प्रणालीमध्ये विविध एआय मॉडेल्सची निवड, प्रतिमा व दस्तऐवज अपलोडची सुविधा उपलब्ध आहे. या प्रणालीमध्ये वापरकर्तानिहाय सुरक्षित लॉगिंग, एंड-टू-एंड एन्क्रिप्शन, पदानुसार प्रवेश नियंत्रण यांसारखी सुरक्षा वैशिष्ट्ये समाविष्ट करण्यात आली आहेत, त्यामुळे शासकीय दस्तऐवज आणि माहितीची गोपनीयता अबाधित राहणार आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, भविष्यात 'महा एआय'चा वापर सर्व शासकीय विभागांमध्ये एकसमान एआय प्लॅटफॉर्म म्हणून करण्यात येणार आहे. तसेच ई-ऑफिस, आरटीआय, ई-एचआरएमएस, आपले सरकार यांसारख्या विविध ई-शासन प्रणालींशी त्याची जोडणी करून मसुदा तयार करणे, भाषांतर, सारांश, ज्ञानसंकलन आणि लाभार्थी पडताळणी यांसारख्या सुविधा अधिक सक्षम करण्यात येतील.

इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह व राज्य सूचना माहिती अधिकारी व उपमहासंचालक, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र सपना कपूर यांनी महा एआय प्लॅटफॉर्मबाबत सादरीकरण केले.

# आपत्तीपश्चात पुनर्बांधणीसाठी वैज्ञानिक मूल्यांकनावर भर द्यावा

भूस्खलन व इतर नैसर्गिक आपत्तींनंतर प्रभावित क्षेत्रांचे वैज्ञानिक पद्धतीने मूल्यांकन करणे आवश्यक आहे. पुनर्बांधणी, पुनर्प्राप्ती आणि दीर्घकालीन आपत्ती जोखीम कमी करण्यासाठी समन्वित व शाश्वत उपाययोजना राबविण्यात येत असून केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध यंत्रणांच्या सहकार्याने या प्रक्रियेला अधिक गती द्यावी ,असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

आपत्तीनंतरच्या प्रतिसाद गरजांचे मूल्यांकन आणि आपत्ती व्यवस्थापन उपाययोजनांचा आढावा घेण्यासाठी विधान भवन येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य आपत्ती व्यवस्थापन आढावा बैठक झाली. बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांच्यासह मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, प्रधान सचिव वेद सिंगल, संचालक डॉ. भालचंद्र चव्हाण तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

ठाणे, रायगड, कोल्हापूर, पुणे, नाशिक तसेच विदर्भ आणि मराठवाड्यातील काही जिल्हे पूर आणि भूस्खलनाच्या दृष्टीने अतिधोका असलेले आहेत. या पार्श्वभूमीवर पूरनियंत्रणासाठी बहुआयामी दृष्टिकोन स्वीकारून पाणी निचरा यंत्रणेत सुधारणा, पूर्वसूचना प्रणाली बळकट करणे आणि प्रभावी स्थलांतर योजना राबविण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भूस्खलन, दरडी कोसळणे आणि संबंधित आपत्तींमुळे होणारी जीवित व वित्तहानी टाळण्यासाठी राज्यभर व्यापक सर्वेक्षण करण्याची आवश्यकता व्यक्त केली. संवेदनशील गावे व ठिकाणांची अद्ययावत आणि अचूक माहिती तयार करून तिचा प्रतिबंधात्मक उपाययोजनांसाठी वापर करण्यात यावा, असे त्यांनी सांगितले.

# कृषी दिनी राज्यस्तरीय कृषी पुरस्कारांचे होणार वितरण : दत्तात्रय भरणे

मुंबई (दै. संध्या)



राज्यातील कृषी, फलोत्पादन, सेंद्रिय शेती आणि कृषी क्षेत्रातील विविध उपक्रमांमध्ये उल्लेखनीय योगदान देणाऱ्या शेतकरी, महिला शेतकरी, तसेच कृषी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने २०२३ व २०२४चे राज्यस्तरीय कृषी पुरस्कार जाहीर केले आहेत. कृषी विकासासाठी केलेल्या योगदानाचा सन्मान करणे हे शासनाचे कर्तव्य आहे. राज्यस्तरीय कृषी पुरस्कार हे कृषी क्षेत्रातील उत्कृष्टतेचे प्रतीक असून नव्या पिढीला प्रेरणा देणारे आहेत. हरित क्रांतीचे प्रणेते आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कृषी दिनाचे औचित्य साधून बुधवार, १ जुलै २०२६ रोजी मुंबई येथे हा सोहळा होणार असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची भेट घेऊन या पुरस्कार सोहळ्यास उपस्थित राहण्यासाठी निमंत्रण दिले. या निमंत्रणाचा स्वीकार राज्यपाल यांनी केला असून त्यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा संपन्न होणार आहे. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या निवड समिती बैठकीत पुरस्कारार्थींची निवड करण्यात आली असून शासनाने त्यास मान्यता दिली आहे. राज्यातील कृषी क्षेत्रात नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार, उत्पादनवाढ, शाश्वत शेती, सेंद्रिय शेती, फलोत्पादन आणि कृषी विस्तार क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा गौरव करण्यासाठी हे पुरस्कार दरवर्षी प्रदान करण्यात येतात.

# तीन तलाक प्रश्नी मुस्लिमांना गोंजारण्यासाठी नवा कायदा

## विजय वडेट्टीवार आणि जयंत पाटील यांनी सरकारला घेरले

मुंबई (दै. संध्या)



मुस्लिम समाजाची मते मिळविण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजपप्रणित एनडीए सरकारने तीन तलाक प्रकरणी नवा कायदा आणत आता फोन, समाज माध्यमांचा वापर करत पत्नीला तलाक देणे गुन्हा ठरवत केंद्राने हा कायदा केला. त्याच्या अंमलबजावणीचा विषय फक्त राज्य सरकारच्या अखत्यारित येतो. पण नाशिक मधील तीन मुस्लिम महिलांच्या पतीने घटस्फोट देत दुसरा विवाह केला हा मुद्दा नाशिकच्या आमदार देवयानी फरांदे यांनी लक्षवेधीच्या माध्यमातून विधानसभेत उपस्थित केला. त्यावेळी काँग्रेसचे विजय वडेट्टीवार आणि राष्ट्रवादीचे जयंत पाटील यांनी ही लक्षवेधी याचिका स्विकारल्यावरून राज्य सरकारला चांगलेच घेरले.

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी मुस्लिम समाजाविषयी आस्था दाखवत या संदर्भात तीन तलाकचा विषय असल्याने त्यावर चर्चा करता येत असल्याचे सांगत त्यामुळेच या विषयावर चर्चा करण्यासाठीच ही लक्षवेधी स्विकारल्याचे सांगितले. पण ही लक्षवेधी मेरिटमध्ये बसत नसल्याचा मुद्दा जयंत पाटील यांनी पुन्हा उपस्थित केला, तसेच ही लक्षवेधी उपस्थित करणाऱ्याच्या बाबत आमच्या मनात कोणताही विरोध नाही. पण ही लक्षवेधी सूचना मेरिटनुसार नसल्याचे सांगत केंद्र सरकारने केलेल्या कायद्यावर राज्याच्या विधानसभेत चर्चा करता येत नसल्याचे स्पष्ट केले.

अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी भाजपा आमदार देवयानी फरांदे यांना लक्षवेधी मांडण्यास परवानगी दिली. त्यावर देवयानी फरांदे यांनी नाशिकमधील एका महिलेस तीच्या पतीने समाज माध्यमांचा वापर करत तलाक दिला. परंतु तीला त्याच्यापासून झालेल्या मुलांचा सांभाळ करण्यास नकार दिला असून ती रहात असलेल्या घराचे हप्तेही तिला भरावे लागत असल्याने त्या महिलेला कठीण आर्थिक परिस्थितीतून जावे लागत आहे. त्याचबरोबर अन्य दोन मुस्लिम महिलांनाही तलाक अर्थात घटस्फोट दिला असून त्या महिलांनाही अशाच पद्धतीतून जावे लागत असल्याचे सांगत यासंदर्भात नाशिक येथील पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. त्यामुळे अशा गुन्ह्यासंदर्भात राज्य सरकारने पावले उचलावित किवा ठोस निर्णय घ्यावेत अशी भूमिका मांडली.

त्यावर राष्ट्रवादीच्या आमदार सना मलिक-शेख यांनी हरकत घेत ही लक्षवेधी सूचना का मांडण्यात आली, असा सवाल करत मुस्लिम धर्मियात बहुपत्नीत्व धोरण स्विकारले आहे म्हणून आहे की, फक्त मुस्लिम महिलांना घटस्फोट दिला जात असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात येत आहे आणि तिसरा म्हणजे, घटस्फोटाचे आणि बहुपत्नीत्वाची प्रकरणे फक्त मुस्लिम समाजातच होतात का अन्य धर्मियांच्यात अशा पद्धतीचे घटस्फोटाची प्रकरणे होत नाहीत का असे सवाल केले.

सना मलिक शेख या आपला आक्षेप नोंदविताना भाजपाच्या इतर महिला आणि पुरुष आमदारांकडून अडथळे आणत सना मलिक शेख यांना बोलण्यापासून रोखण्याचा प्रयत्न करण्यात येत होता. त्यानंतर गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी देवयानी फरांदे यांच्या लक्षवेधीला उत्तर देताना सांगितले की, ट्रिपल तलाक प्रकरणी यापूर्वी अनेक गुन्हे दाखल झालेले आहेत. मात्र त्यावर अद्याप पुढील कारवाई सुरु असल्याचे सांगितले.

मात्र या प्रकरणी एक ठोस नियमावली तयार करावी लागणार असल्याचे सांगितले. तर यावर बोलताना गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी सना मलिक शेख यांनी ट्रिपल तलाक प्रश्नी मांडलेली रुपरेखा महत्वाची असून त्यास त्या सकारात्मक पध्दतीने सूचना असल्याचे सांगताना महाराष्ट्रात समान नागरी कायदा आहे असे सांगितले.


क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

www.sandhyaepaper.com


## ढिंग-टांग




## खासदार निधीच्या आरोपांवर ओमराजे निंबाळकरांचे उत्तर

# मागील टर्मचा एकही पैसा अखर्चित नाही

मुंबई (दै. संध्या)

- आधी गणित समजून घ्या!; आकडेवारीच मांडली



विकासकामांसाठी निधी मिळत नसल्याचे कारण देत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या 6 खासदारांनी नुकताच एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला. मात्र, या बंडखोर खासदारांच्या खात्यात 'खासदार निधी'चे (MPLADS) कोट्यवधी रुपये पडून असल्याचे आकडेवारीसह समोर आल्यानंतर विरोधकांनी त्यांच्यावर जोरदार टीका सुरू केली. या आरोपांना आता धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी एका पत्रकार परिषदेत सडेतोड उत्तर दिले असून, विरोधकांना खासदार निधीचे 'गणित'च समजावून सांगितले आहे. "माझ्या मागील 5 वर्षांच्या कार्यकाळातील एकही पैसा अखर्चित राहिलेला नाही आणि सध्याच्या निधीचे मूल्यमापन आताच करणे चुकीचे आहे," असे म्हणत ओमराजे निंबाळकर यांनी विरोधकांचे दावे खोडून काढले आहेत.

विरोधकांच्या आरोपांना उत्तर देताना ओमराजे म्हणाले की, खासदार निधीचे मूल्यमापन हे मुदत संपण्यापूर्वी करणे चुकीचे आहे. खासदार निधी 5 वर्षांसाठी मिळतो. "तुम्ही माझे मूल्यमापन करत असाल, तर माझ्या पहिल्या टर्मचे (2019 ते 2024) करा. या 5 वर्षांत ओमराजे निंबाळकर यांना मिळालेल्या खासदार निधीमधला एक पैसाही अखर्चित राहिलेला नाही, याची माहिती कुणीही 'MPLAD'च्या अधिकृत वेबसाईटवरून काढू शकते. सध्याच्या (2024-2029) कार्यकाळाचे मूल्यमापन 2029च्या मार्चनंतर करा, तेव्हा जर निधी शिल्लक राहिला तर मला जाब विचारा."

अधिकृत आकडेवारीत ओमराजेंना 18 कोटी रुपये निधी मिळाल्याचे दिसत आहे. या 18 कोटींच्या आकड्यामागील सत्य सांगताना ते म्हणाले, "खरे तर एका वर्षाला 5 कोटी याप्रमाणे 3 वर्षांचे 15 कोटी मिळायला हवे होते. पण माझ्या खात्यात 18 कोटी रुपये दिसतात. कारण, माझ्यापूर्वी (2019च्या आधी) जे खासदार होते, त्यांनी त्यांच्या काळातील खासदार निधी खर्च केला नव्हता. तो अखर्चित राहिलेला 3 कोटींचा निधी माझ्या खात्यात वर्ग होऊन आला आहे, त्यामुळे तो आकडा 18 कोटी दिसत आहे."

खासदार निधी मतदारसंघाच्या विस्ताराच्या तुलनेत किती तुटपुंजा असतो, याचे गणित ओमराजेंनी मांडले. ते म्हणाले, माझ्या धाराशिव लोकसभा मतदारसंघात साधारणतः 2,475 मतदान केंद्रे (बूथ) आहेत. खासदाराला एका वर्षाला 5 कोटी रुपये मिळतात, म्हणजे 5 वर्षांचे एकूण 25 कोटी रुपये होतात. जर हे 25 कोटी रुपये मतदारसंघातील 2,475 बूथमध्ये समान वाटायचे ठरवले, तर 5 वर्षांसाठी एका बूथला फक्त 1 लाख रुपये वाट्याला येतात. आजच्या काळात कोणत्याही गावात 1 लाख रुपयात शाळेचे कम्पाऊंड, सार्वजनिक सभागृह, रस्ते किंवा सभामंडप उभे राहू शकत नाही. कोणत्याही एका कामासाठी किमान 7 ते 10 लाख रुपये लागतात. ते पुढे म्हणाले की, "जर मी एखाद्या गावात एखादे काम करण्यासाठी 7 ते 10 लाख रुपये खासदार निधी दिला, तर याचा अर्थ मी 5 ते 6 बूथचे (गावांचे) पैसे एकाच ठिकाणी दिले. मग ज्या उर्वरित 6 गावांना निधी मिळाला नाही, तिथले नागरिक प्रश्न विचारतात की आम्हीही मतदान केले होते, मग आम्हाला निधी का नाही? गावातल्या प्रत्येक माणसाची लोकप्रतिनिधींकडून किमान एका विकासकामाची माफक अपेक्षा असते. मात्र, केवळ खासदार निधीवर संपूर्ण मतदारसंघाचा विकास करणे शक्य नसते. त्यामुळेच राज्याच्या सत्तेत राहून अतिरिक्त निधी आणि विकासकामे खेचून आणणे आवश्यक असते, याच कारणासाठी सत्तेत सहभागी होण्याचा निर्णय घ्यावा लागला, अशी स्पष्ट भूमिका ओमराजे निंबाळकर यांनी मांडली.

# हिवाळी पाडा येथील शाळेच्या विद्यार्थ्यांसोबत शिक्षणमंत्री दादा भुसे यांचा व्हिडिओ कॉलद्वारे संवाद

मुंबई (दै. संध्या)



शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी नाशिक जिल्ह्यातील दुर्गम आदिवासी भागातील हिवाळी पाडा ता. त्र्यंबकेश्वर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थीशी थेट व्हिडिओ कॉलद्वारे संवाद साधत विद्यार्थ्यांचे कौतुक केले. निसर्गरम्य वातावरणात वसलेली ही शाळा केवळ शिक्षणाचे केंद्र नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची प्रयोगशाळाच ठरत आहे. विशेष म्हणजे ही शाळा सकाळी ९ ते रात्री ९ अशा तब्बल १२ तास विद्यार्थ्यांसाठी कार्यरत असून वर्षभर सातत्याने विविध शैक्षणिक आणि कौशल्याधारित उपक्रम राबविले जातात, या उपक्रमांचे मंत्री भुसे यांनी कौतुक केले. शाळेत शेती, परसबाग, पर्यावरण संवर्धन, श्रमसंस्कार आणि प्रयोगात्मक शिक्षण यांसारख्या उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी उपलब्ध करून दिली जाते. त्यामुळे शिक्षण अधिक आनंददायी, उपयुक्त आणि जीवनाभिमुख बनले आहे. यावेळी शाळेतील शिक्षक केशव गावित यांच्या उपस्थितीत शिक्षणमंत्री भुसे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या अध्ययनाची माहिती घेतली; तसेच विद्यार्थ्यांच्या आकलन क्षमतेचा आणि शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेतला. तसेच नियमित अभ्यास, वाचनाची सवय आणि ज्ञानवृद्धीसाठी सातत्याने प्रयत्न करण्यासंदर्भात शिक्षणमंत्र्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

शाळेतील स्वच्छता, शिस्त आणि विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक स्वच्छतेबाबतही त्यांनी विशेष समाधान व्यक्त केले. विद्यार्थ्यांचे व्यवस्थित कापलेले केस, स्वच्छ गणवेश, कापलेली नखे; तसेच स्वच्छ आणि सुंदर शालेय परिसर पाहून त्यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. स्वच्छता आणि शिस्त या गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या मूलभूत बाबी असून प्रत्येक विद्यार्थ्याने त्याचे पालन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी मंत्री भुसे म्हणाले की, दुर्गम भागातील हिवाळी पाडा शाळेने शिक्षण, स्वच्छता आणि नावीन्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून राज्यासमोर आदर्श निर्माण केला आहे. स्वच्छ शाळा शिस्तबद्ध विद्यार्थी, गुणवत्तापूर्ण शिक्षण हीच उज्वल भविष्याची गुरुकिल्ली आहे. विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी शिक्षक, पालक, प्रशासनाने संयुक्तपणे कार्य करणे आवश्यक आहे.

राज्यातील प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण पोहोचावे, शाळांमध्ये सकारात्मक शैक्षणिक वातावरण निर्माण व्हावे आणि विद्यार्थ्यांमध्ये अध्ययनासोबतच स्वच्छता व शिस्तीच्या सवयी दृढ व्हाव्यात यासाठी अशा प्रकारचे नियमित आढावे आणि संवाद उपक्रम सातत्याने राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# संपादकीय

## ‘देणारे’ कंत्राटदार मांडताहेत ‘टक्केवारी’चा हिशेब...

महाराष्ट्र स्टेट गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर फेडरेशनचे राज्यस्तरीय महाअधिवेशन १४ जून रोजी कोल्हापुरात पार पडले. या अधिवेशनात कंत्राटदार संघटनेच्या एका अध्यक्षाने बांधकाम खात्याच्या एकूणच कारभाराचा पाढा वाचला. कोणकोणत्या टप्प्यावर किती किती टक्के वाटप करावे लागते, याचा थेट ‘हिशेब’च मांडला. त्यात लोकप्रतिनिधी आणि वेगवेगळ्या टप्प्यांवरील अभियंते-अधिकाऱ्यांचाही स्पष्ट उल्लेख आहे. या वाटपामुळे कंत्राटदार कसे देशोधडीला लागत आहेत, त्यातूनच त्यांचा ९० हजार कोटींपेक्षा अधिक देयकांचा अनुशेष निर्माण झाला आहे, हे सांगितले गेले. मात्र या प्रथितयश कंत्राटदाराच्या विधानावर आतापर्यंत ना कुण्या लोकप्रतिनिधीने आक्षेप नोंदविला, ना अभियंत्यांच्या संघटनेने. त्यामुळे कंत्राटदाराने टक्केवारीचे केलेले आरोप संबंधितांना मान्य आहेत का, असा प्रश्न उभा होतो.

राज्य शासनात सार्वजनिक बांधकाम हे चौथ्या क्रमांकाचे महत्त्वाचे खाते आहे. हे खाते मिळविण्यासाठी सरकार आणि प्रशासनात प्रचंड चढाओढ असते. आजघडीला या खात्याचे एकूण बजेट दीड लाख कोटींपेक्षा अधिक आहे. जसे ‘सत्तेतून पैसा आणि पुन्हा पैशातून सत्ता’ हे समीकरण राजकारणात रूढ झाले, तसेच ‘पैशातून पोस्टिंग आणि पोस्टिंगमधून पुन्हा पैसा’ हे समीकरण बांधकाम खात्यात स्थिरावले आहे. बजेट वाढले, तशी स्पर्धाही वाढली. त्यातून पोस्टिंग करताना अभियंत्यांचे मेरिट दुय्यम ठरत गेले. या खात्यात टक्केवारी, मार्जिन, लिलाव, टोल यांसारखे पडलेले पायंडे नेहमीच चर्चेत राहिले आहेत. मुंबईतील सी-लिंक, मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे ही सार्वजनिक बांधकाम अभियंत्यांच्या तांत्रिक कौशल्याची आजही मोठी उपलब्धी मानली जाते. आता मात्र ‘टक्केवारी’मुळे या खात्याची प्रतिमा मलीन होते आहे. त्यासाठी बड्या कंत्राटदारांमधील जीवघेणी स्पर्धाही तेवढीच कारणीभूत आहे. ‘देणारे’ कंत्राटदारच या खात्याचे जाहीर वाभाडे काढू लागले आहेत. बांधकाम खात्याचा कारभार पारदर्शक व्हावा म्हणून आयएएस दर्जाचे सचिव आणले गेले. परंतु त्यामुळे शासनाचे उद्दिष्ट खरोखरच साध्य झाले का, यावर चिंतन अपेक्षित आहे. सार्वजनिक बांधकाम खात्यात गुणवत्ता नियंत्रण (क्वालिटी कंट्रोल) विभाग आहे. मात्र, तेथेही ‘गळती’ असल्याने कंत्राटदार या विभागाची तपासणी कधीच मनावर घेत नाहीत. फार तर ताकीद, वेतनवाढ रोखण्यासारखी क्षुल्लक कारवाई होत असल्याने अभियंत्यांना कुठली भीती उरलेली नाही. आता तर कंत्राटदारच अथॉरिटी इंजिनिअरची नियुक्ती करतो. पोस्टिंगची भूक कमी होताना दिसत नाही. डीजीपी झाल्यानंतरही एखाद्या अधिकाऱ्याला ‘डीआयजी’ पदाचा मोह सुटावा, असा हा उफराटा प्रकार आहे. सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना मुदतवाढ देण्याचा विक्रमही याच खात्याच्या नावावर आहे. बिग बजेट महामंडळाच्या एका उच्चपदस्थ अधिकाऱ्याला तर चक्क ‘पुढील आदेश होईपर्यंत’ अशी जणू अमर्याद काळासाठी मुदतवाढ दिली गेली. सर्वाधिक भ्रष्टाचार असूनही या विभागात सर्वात कमी ट्रॅप का, हा जनतेतून विचारला जाणारा सवाल लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कर्तव्यदक्षतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा आहे. सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अखत्यारित महाराष्ट्र निश्चितच प्रगती करतो आहे. ठिकठिकाणी चकचकित रस्ते, पूल, उड्डाणपूल, उत्तुंग इमारती दिसत आहेत. परंतु प्रामाणिकता, गुणवत्ता, दर्जा याबाबत जनमाणसात तेवढाच अविश्वासही पाहायला मिळतो. बजेट नसताना सरकारने काढलेल्या हजारो कोटींच्या निविदांमुळेच कंत्राटदारांच्या थकीत देयकांचा डोंगर ९० हजार कोटींवर पोहोचला आहे. त्यातून अनेक कंत्राटदारांनी आर्थिक विवंचनेपायी जीवनयात्राही संपविली. परंतु त्यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्याचे प्रयत्न होताना दिसत नाहीत. पुढील तीन वर्षे कोणत्याही नव्या कामाला मंजुरी न देणे, सुरू असलेली कामे आहे त्या स्थितीत थांबविणे आणि आधी कंत्राटदारांची देयके देणे यावर भर दिल्यास ९० हजार कोटींचा अनुशेष नियंत्रणात येण्यास वेळ लागणार नाही, पण शेवटी प्रश्न इच्छाशक्तीचा आहे.

## संस्कृत सुभाषित

मूर्खस्यपश्चचिन्हानि गर्वी दुर्वचनी तथा।
हठी चाप्रियवादी च परोक्तं नैव मन्यते।।

मूर्ख माणसाची पाच लक्षणे सांगता येतील ती अशी, घमेंडखोर वागणारा, वाईट बोलणारा, हट्टी, अप्रिय कथन करणारा आणि दुसऱ्याचे कधीच न ऐकणारा.

## गुरु वचन

### मृत्यूचे भय नाही

एखदा एका राज्याच्या महाराणीचा हिऱ्यांचा हार हरवला. हा हार राणीचा जीवापेक्षा प्रिय होता. यामुळे तिने त्यास शोधण्यासाठी अनेक प्रयत्न केले परंतु तो कुठेही सापडला नाही. हारासाठी राणी परेशान झाल्याचे पाहून राजाने दवंडी दिली की, ज्या कोणालाही हा हार सापडला असेल त्याने तीन दिवसांच्या आत परत करावा, अन्यथा त्याला मृत्यूदंड देण्यात येईल.

योगायोगाने तो हार एका साधूला मिळाला. त्याच्या मनात हाराविषयी कसलेही आकर्षण नव्हते. परंतु त्याने या विचाराने तो हार स्वत:कडेच ठेवला की, हा हार शोधत-शोधत कुणीतरी त्याच्याकडे येईल आणि नंतर त्यास तो हार देवून टाकेल. दुसऱ्या दिवशी त्याने राज्याची दवंडी ऐकली परंतु तो हार देण्यास न जाता तपश्चर्येत तल्लीन राहिला. राजाच्या दवंडीनुसार तीन दिवस उलटले होते.

चौथ्या दिवशी तो साधू हार घेऊन राजादरबारात पोहोचला. तेव्हा राजाला माहीत झाले की हार तीन दिवसांपासून साधूच्या जवळ होता तरीही तो देण्यास आला नाही. त्यामुळे राजाला राग आणि त्याने साधूला प्रश्न केला तू माझी दवंडी ऐकली नव्हतीस. त्यावर साधून उत्तर दिले, ऐकली होती परंतु मी हार परत करण्यास पूर्वीच आलो असतो तर लोकांनी विचार केला असता की, साधू असतानाही मरणाला घाबरून हार देण्यास आला आहे. तेव्हा राजाने विचारले आज चौथ्या दिवशी का आलास. त्यावर साधू म्हणाला मृत्यूची भीती नाही, परंतु कुणा दुसऱ्यांची संपत्ती मी आपल्याजवळ ठेवणे पाप समजतो. हारासारख्या छोट्या गोष्टीशी मला काहीही घेणेदेणे नाही. साधूचे हे बोलणे एकून राजाने शर्मेने मान खाली केली. सोबतच राणीला आपल्या चुकीची कल्पना झाली आणि तिने तो हार विकून त्यापासून मिळालेले पैसे गरीबांना वाटून टाकले.

## उपदेशकथा

### वनौषधी

तरुण पती तीर्थयात्रेस निघाला. पत्नी विरहाच्या आशंकेने व्याकुळली. तिचे मन वळवण्याची बरीच खटपट केली. पण नवरोजी बधले नाहीत. अखेर तिने तब्बेतीची काळजी घ्या, असे काकुळतीने विनविले. आईने घरगुती वनस्पतींचे बाळकडू पाजलेले. त्यामुळे एक तोडगा तिला आठवला. जाण्याच्या वाटेवर नेहमी चिंचेच्या झाडाखाली झोपत जा नि परतीच्या वाटेवर आठवणीने निंबाखाली’. तसे तिने पतीकडून वचन घेतले. दोन महिने तरी पतिराज दूर राहणार होते. पण आता निश्चिंत होती. तिच्या मनासारखे झाले. नवरा पंधरा दिवसांनीच परतला. इंगित असे की, चिंचेच्या छायेत झोपल्यास सर्दी-पडशाळा, हिवतापाला आवतण दिल्यासारखे होते. जाताना तसे केले नि आजारी पडून त्याने परत फिरायचे ठरवले. मजल दरमजल करत परत फिरताना त्याने वचन दिल्याप्रमाणे कडुनिंबाचा आसरा घेतला नि त्याची बिघडलेली तब्येत सुधारली. पत्नीचा हेतू साध्य झाला. याचा अर्थ असा नव्हे की, निंबाची झाडे लावली तर गावात दवाखान्याची गरज सरली !

कथा उपदेश : वनस्पतींचे गुणधर्म उमजून त्या आपण अधिक वापरायला शिकावे, इतकेच.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | नक्षत्र:चित्रा १३:५८:४९ |
| २४ जून २०२६ | योग:परिध १०:२२:३० |
| बुधवार | करण:गर १८:१२:३५ |
| विक्रम संवत्- २०८२ | करण:वणिज (अहोरात्र) |
| निज ज्येष्ठशके | सूर्य:मिथुन |
| संवत्- १९४८ | चन्द्र:तुला००:५२:३४ |
| संवत्सर - पराभवनाम | हिजरी सन् - १४४८ |
| अयन- दक्षिणयन | मुस्लिम मास - मोहरम |
| मास- निज ज्येष्ठ | तारीख - ८ |
| ऋतु- सौर ग्रीष्म | विशेष |
| शुक्ल पक्ष | शुभ दिवस |
| तिथि:दशमी १८:१२:३५ | |

## दै. ‘संध्या’ धमाल सूडोकु क्र. ९९०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | | | | | | 7 | | 3 |
| | | 1 | 7 | | 3 | | 2 | |
| | 9 | | 5 | | | | | 6 |
| | | 9 | | 1 | | 8 | 3 | |
| 1 | 7 | | | 4 | | | 6 | 5 |
| | 3 | 6 | | 7 | | 2 | | |
| 3 | | | | | 8 | | 1 | |
| | 5 | | 4 | | 1 | 6 | | |
| 9 | | 4 | | | | | | 8 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. ९८९ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | 1 | 9 | 6 | 8 | 2 | 4 | 7 | 5 |
| 6 | 7 | 8 | 4 | 1 | 5 | 2 | 3 | 9 |
| 5 | 4 | 2 | 3 | 9 | 7 | 1 | 8 | 6 |
| 4 | 2 | 6 | 1 | 7 | 3 | 9 | 5 | 8 |
| 7 | 8 | 1 | 9 | 5 | 6 | 3 | 4 | 2 |
| 9 | 5 | 3 | 2 | 4 | 8 | 6 | 1 | 7 |
| 2 | 3 | 7 | 5 | 6 | 4 | 8 | 9 | 1 |
| 8 | 9 | 4 | 7 | 2 | 1 | 5 | 6 | 3 |
| 1 | 6 | 5 | 8 | 3 | 9 | 7 | 2 | 4 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १३१४ – बॅनॉकबर्नची लढाई – रॉबर्ट द ब्रुसने एडवर्ड दुसऱ्याला हरवून स्कॉटलँड पुन्हा स्वतंत्र केले.
- १३४० – शंभर वर्षांचे युद्ध – एडवर्ड तिसऱ्यालाने फ्रांसच्या आरमाराचा धुव्वा उडवला.
- १४४१ – इटन कॉलेजची स्थापना.
- १४९७ – जॉन कॅबट न्यू फाउंडलँडला पोचला.
- १५७१ – मिगेल लोपेझ दि लेगाझ्पीने मनिला शहराची स्थापना केली.
- १६६४ – न्यू जर्सी वसाहतीची स्थापना.

### राष्ट्रीय

- २००६ – गुजरात राज्यातील सर्वात सुरक्षित समजल्या जाणाऱ्या साबरमती तुरुंगात कैद्यांच्या दोन गटात झालेल्या हाणामारीत एका कैद्याचा मृत्यू झाला.
- २००६ – ‘माय ब्रदर निखिल‘ या दिग्दर्शक ओनिर यांच्या चित्रपटाला मिलानच्या समलिंगी चित्रपट महोत्सवात ऑडियन्स चॉईस पुरस्कार मिळाला.
- २००७ – कसाऱ्याजवळील फुगाळा या आदिवासी पाड्यात शिवकालीन गुहेचा शोध लागला.
- २००८ – बांद्रे रेल्वे स्थानक ते कलानगर अशा सुमारे सव्वा किलोमीटर लांबीच्या मुंबईतील पहिल्याच स्काय वॉकचे मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

### जन्म

- १९०९ – प्रसिद्ध शास्त्रीय नर्तक गुरू गोपीनाथ यांचा जन्म

### निधन

- २००६ – सुमनपाल माहीम कर, सुप्रसिद्ध माहीमकर प्रिंटींग प्रेसचे मालक आणि ऑल इंडिया फेडरेशन ऑफ मास्टर प्रिंटर्सचे माजी अध्यक्ष यांचे निधन.

## : SMS :

Once A Chunti saw a Piece of Gurr n Piece of Imlee, She went to eat them but, On the way She saw a Chunta, She left the Gurr n Imlee and went with the Chunta...

Moral: Gurr se Meetha Ishq Ishq, Imlee se khatta Ishq Ishq. :-)

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३७.२ | २७.३ |
| अहमदनगर | ३६.२ | २५.२ |
| अकोला | ४१.७ | ३१ |
| अमरावती | ४२.७ | ३१.९ |
| बीड | ४४.६ | ३०.१ |
| भंडारा | ४३.४ | ३२.३ |
| बुलढाणा | ४०.९ | २९.६ |
| चंद्रपूर | ४४.१ | ३०.६ |
| चेन्नई | ४४.२ | ३२.७ |
| नवी दिल्ली | ४१.६ | ३०.९ |
| धुळे | ४०.७ | २९.४ |
| गोंदिया | ४२.१ | ३१.५ |
| जळगाव | ४०.९ | २९.९ |
| कोल्हापूर | ३३.१ | २२.७ |
| लातूर | ३७.६ | २६.८ |
| मुंबई | ३९.२ | ३४ |
| नागपूर | ४३.१ | ३०.८ |
| नांदेड | ४१.७ | ३०.५ |
| नंदूरबार | ३७.२ | २७ |
| नाशिक | ३५.६ | २४.८ |
| पुणे | ३२.३ | २३.९ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पूर्व नवीन योजनेचा शुभारंभ होण्याचा योग आहे. खर्च कमी करण्याचा प्रयत्न करा.

**तुळ :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:दक्षिण उत्पन्नात वाढ होण्याचे योग आहेत. मित्र, सहकारी यांची मदत मिळेल.

**वृषभ :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा :पूर्व आरोग्य चांगले राहील. आर्थिक योग मध्यम आहेत. व्यापारिक प्रकरणात जबाबदारी वाढणार आहे.

**वृश्चिक :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: पश्चिम आपण केलेल्या कामाची सुरूवात चांगली होईल. साहसीवृत्तीत वाढ होण्याची शक्यता आहे.

**मिथुन :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा: पूर्व चैनी करण्याकडे मन झुकेल. आपल्या कामात बुध्दी चातुर्याचा उपयोग केल्यास फायदा होईल.

**धनु :** शुभ रंग : जांभळा, शुभ दिशा :पश्चिम जीवनसाथीच्या आरोग्याची काळजी घ्या. आर्थिक समस्या येऊ शकते.

**कर्क :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा:पूर्व आज आपल्या कामात आपल्याला उत्साह वाटणार आहे. बुद्धीचा उपयोग करून पैसा गुंतवणूक करा.

**मकर :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:पश्चिम मुलांच्या प्रगतीमुळे प्रसन्न वातावरण राहणार आहे. नोकरीमध्ये अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळेल.


**सिंह :** शुभ रंग:लाल,शुभ दिशा: दक्षिण केलेल्या कामाचे चीज होईल. आपल्या कलेचे सादरीकरण करण्याची संधी मिळेल.

**कुंभ :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पश्चिम व्यापार व्यवसाय चांगला चालेल. कौटुंबिक जीवन आनंदी राहील.

**कन्या :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा: पश्चिम आपण घेतलेले निर्णय योग्य राहतील. सामाजिक प्रसिद्धी मिळेल.

**मीन :** शुभ रंग : काळा,शुभ दिशा:पूर्व आपल्या पराक्रमामुळे समाजात व कुटुंबात आपली प्रतिष्ठा वाढणार आहे. आर्थिक फायदा होईल.

## ‘दै. संध्या’ जम्बो शब्दकोडे क्र. ९९०



**आडवे शब्द**

१. घटस्फोटीत स्त्रीला नवऱ्याकडून मिळणारी रक्कम
३. घासात मातीचे कण यावेत तशी कटकट
६. चंद्र
९. भूलथापा देऊन लुबाडणारा
११. लवचिक नसलेला
१२. डमरूचा आवाज
१३. नमुना
१४. रोखलेली नजर
१६. पाढ्याची उजळणी
१७. आश्चर्य
१८. अवधान, लक्ष
१९. निमंत्रण देणे
२३. पहिला ’सुपरहिट’ हिंदी नावाप्रमाणे ’नशीब’ काढलेला!
२५. कोळसा, जळाऊ लाकूड इ.
२७. काच कापण्यासाठी उपयोगी कठीण रत्न
२८. पूर्ण भरतीची वेळ
२९. कणीदार
३१. लेंगा
३२. इजा, प्रहार (चारित्र्याशी जोडल्यास बदनामी)
३४. प्राणांतिक वेदना
३७. छोटासा
३९. केस, कुंतल
४१. चलाख, हुशार
४३. पेशवाईतील सव्यंपाकघर, ---- खाना
४३अ. आणि
४४. यात्रेस जाणारा
४७. गुण, सत्त्व
४९. वजन, बोजा
५०. समोरासमोरची भेट
५२अ. वृत्तचिती
५४. प्रतिज्ञा करून
५७. मस्ती, जोम
५८. मगज
५९. महिरपदार रचना
६१. मग्न, गुंग
६३. आळवल्यास संगीत
६५. छोटे कुबड
६७. सपाट
७०. मळखाऊ रंग
७१. भयंकर
७२अ. लहर, तरंग
७३. सहाय्य
७४. परिपक्व न झालेला
७५. जिवघेणा विळखा
७७. जिवलग मित्र
७८. आरास, देखावा
७९. सदोदित, देखावा
८०. जमीनदोस्त

**उभे शब्द**

१. नकलाकार पक्षी
२. श्रीकृष्णोपदेश
३. अन्न जळणे
४. किंचित कडू चव
५. पदार्थ ढवळण्याचे छोटे साधन
६. फूल
७. जास्तीत जास्त कमीत कमी
८. आवड, रुची
१०. पाषाणहृदयी, विनाशक
१५. खबदाड
२०. धनुष्यबाण, तीरकमान
२१. युद्ध, वाळवंट
२२. भडीमार
२४. होडी
२५. लायक, पात्र, क्षमता असलेला
२६. पूर्ण नाश
२७. बर्फाचा पर्वत
२८. क्वाचित
३०. हिस्सेदार
३१. लसूण, कांदा यांचे हिरवे पान
३३. शहर
३५. सैन्याचा दाणागोटा
३६. मागणारा
३८. टक, दृष्टी
४०. पोळी-भाकरीचा चौथा भाग
४१. सुद्धा, तथापि, निदान
४२. बारा वर्षाचा काळ
४३. हिंदीत माझ्यासारखा
४४. गंध
४५. गुरांचा घोळका
४६. भांडण
४७. संकरित रोप
४८. विलक्षण, नवीन, पूर्वी न घडलेले
४९. झुणका ----
५१. मनाला आलेला थकवा
५२. फण्यावर दहाचा आकडा मिरवणारा
५३. भित्रा, घाबरट
५४. लाज
६०. वाळा, त्याचे अत्तर
६२. शिव्याशाप
६३. दासबोध लिहिणारे संत
६४. वटवट, त्रास
६६. युक्ती
६८. ग्रामपंचायतीतील एक अधिकारी
६८अ. केसांची बट
६९. नक्की, खात्रीने
७२. निकट
७६. दोस्त
७७. मैत्रीण, सखी

**जम्बो शब्दकोडे क्र. ९८९ चे उत्तर**

आडवे उत्तर १.रवि सोम मंगळ बुध गुरु शुक्र शनि ९.खवा १०.गदा ११.ऱ्हास १३.वाहवा १५.किमान १७.पळवाट १९.सदन २०.जननी २१.कवठ २२.पारावार २३.दानत २४.कला २५.सल २७.गाकर २९.कापा ३१.वामा ३२.आजवर ३४.रज ३५.सागरतट ३६.धारा ३८.बारह ३९.मदत ४०.नत ४१.बकर ४२.खल ४३.लस ४४.वाव ४५.जम ४६.करंगळी ४८.सागर ४९.कंड ५०.कस ५४.भेदरट ५६.विनाकारण ५८.सण ५९.दर ६०.वाजव ६३.साज ६४.तारा ६६.कार ६७.करवंद ६९.सरकी ७१.लव ७३.कार ७५.सवड ७६.तरतरीत ७९.रीम ८०.कट्टा ८१.डग ८२.नवरदेव

उभे उत्तर : १.रखवालदार २.विवाह ३.मग ४.मंदाकिनी ५.बुक्का ६.गुऱ्हाळ ७.रुसवा ८.क्रय १२.टन १४.वाजतगाजत १६.नकलाकार १७.पठण १८.टपाल १९.सवालजबाब २५.समाधान २६.हर हर महादेव २८.रसातल ३०.पातळसर ३३.वरकड ३४.रद ३७.रातवा ३९.मधुकर ४२.खळी ४३.लगत ४४अ.वकर ४७.गर्जना ५१.सटवाई ५२.गरजवंत ५३.घण ५५.दरसाल ५७.कासार ५८.सरासरी ६१.सरकारी ६२.अवसर ६५.बाकी ६७.कडक ६८.दरड ७०.रतन ७२.वळीव ७४.रमणी ७७.तग ७८.टर

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily “Sandhya” News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

# सफाई कामगारांचे प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावा : भगवत प्रसाद मकवाना

पुणे (दै. संध्या)



सफाई कामगारांच्या समाजाच्या कल्याणाकरिता जिल्हा प्रशासनाने सफाई कामगारांचे प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावावेत, सफाई कामगारांचे सर्वेक्षण करुन त्यांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी, सफाई कामगार क्षेत्रात कार्यरत अधिकृत संघटनांना सोबत घेवून त्यांच्या समस्या सोडविण्यात याव्यात, असे निर्देश सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाच्या केंद्रीय निगरानी समिती सदस्य तथा उत्तराखंड राज्याच्या सफाई कर्मचारी आयोगाचे उपाध्यक्ष (राज्यमंत्री) भगवत प्रसाद मकवाना यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालय येथे हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांच्या नियुक्तीस प्रतिबंध घालणे व त्यांचे पुनर्वसन करणे याबाबतचे अधिनियम २०१३ ची अंमलबजावणी, सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या व त्याचे निराकरण करण्याबाबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, सहायक आयुक्त समाज कल्याण विशाल लोंढे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी राधाकिशन देवढे यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी तसेच विविध संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

श्री. मकवाना म्हणाले, सफाई कामगारांचे कामकाज, वेतन, सेवा अटी आणि कल्याणाकरिता 'लाड-पागे' समिती स्थापन करण्यात आलेली असून सफाई कामगारांच्या जीवनमान सुधारण्यासाठी या समितीने महत्त्वपूर्ण शिफारसी केल्या आहेत. समितीच्या शिफारशीची प्रभावीपणे अंमलबजावणी करुन वारसा हक्काने भरावयाच्या पदांबाबतची कार्यवाही गतीने पूर्ण करावी. सफाई कामगाराच्या कल्याणाकरिता घरकूल, आरोग्य, शिक्षण, रोजगार, कौशल्य विकास, पदोन्नती आदी विषयांशी निगडित असलेल्या विविध कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी. पुणे महानगरपालिकेने 'वाल्मिकी भवन' उभारण्याच्यादृष्टीने कार्यवाही करावी.

ते पुढे म्हणाले, नगर विकास विभागाचे २२ ऑक्टोबर २००८ रोजीच्या शासन निर्णयानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजना लागू करण्यात आली असल्याने या आदेशाच्या दिनांकानंतर सेवानिवृत्त झालेल्या सफाई कामगारांची सेवा २५ वर्षे किंवा त्याहून अधिक झाली आहे असे सफाई कामगार आणि २२ ऑक्टोबर २००८ नंतर सेवेत असलेले जे सफाई कामगार मृत्यू झाले आहेत अशा मृत सफाई कामगारांच्या पात्र वारसांना घरे उपलब्ध करुन देण्यात यावी.

'शेवटच्या व्यक्तीचा विकास' हे केंद्र व राज्यशासनाचे उद्दिष्ट असून याद्दष्टीने सफाई कामगाराच्या कल्याणाकरिता विविध लोककल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. विविध लोककल्याणकारी योजनांची व्यापक स्वरुपात जनजागृती करावी. कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना आरोग्य सेवांचा लाभ कॅशलेस सुविधांचा लाभ देण्याची कार्यवाही करावी. सफाई कर्मचाऱ्यांशी निगडित प्रलंबित मार्गी लावून तसा अहवाल आयोगाकडे सादर करावा, अशा सूचना श्री. मकवाना यांनी दिल्या.

श्रीमती कदम म्हणाल्या, या बैठकीत समितीने दिलेल्या निर्देशाप्रमाणे जिल्ह्यात कार्यवाही करण्यात येईल. सर्व संबंधित विभागाने केलेल्या कार्यवाहीबाबतचा अनुपालन अहवाल आयोगाकडे सादर करावा, असेही श्रीमती कदम म्हणाल्या.

या बैठकीत विविध सामाजिक संघटनेच्या प्रतिनिधींनी सूचना केल्या. प्रशासनाच्यावतीने केलेल्या कार्यवाहीबाबत बैठकीत माहिती दिली.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### एकल महिला धोरणासाठी कार्यशाळा संपन्न

पुणे (दैनिक संध्या) : विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता, अविवाहित व इतर एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी राज्य शासन स्वतंत्र एकल महिला धोरण तयार करत असून, त्याअनुषंगाने "एकल महिला दिवस" निमित्त जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, पुणे व जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबाक), जिल्हा परिषद पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद, पुणे येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेस महिला व बाल कल्याण समितीच्या सभापती अंकिताताई पाटील, जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबाक) आनंद खंडागळे, जिल्हा परिविक्षा अधिकारी दत्तात्रय कुटे तसेच एकल महिला, स्वयंसेवी संस्था, महिला संघटना, सामाजिक कार्यकर्ते व अभ्यासक उपस्थित होते. यावेळी रोजगाराच्या संधी, मालमत्तेचा हक्क, अपत्यांचे शिक्षण, निवारा, शासकीय योजनांच्या अंमलबजावणीत सुधारणा, नवीन योजनांची गरज, कायदेशीर अडचणी, न्यायालयीन प्रक्रियेतील सुधारणा तसेच महिलांची सुरक्षा व सहभाग वाढविण्याबाबत सूचना व अभिप्राय नोंदविण्यात आले. प्राप्त सूचना व अभिप्रायांचा समावेश करून एकल महिला धोरणाचा मसुदा शासनास सादर करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

### स्टँड अप इंडिया योजनेअंतर्गत नवउद्योजकांना मार्जिन मनी योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

पुणे (दैनिक संध्या) : केंद्र शासनामार्फत स्टँड अप इंडिया योजना राबविण्यात येत असून, अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील नवउद्योजकांना उद्योग-व्यवसाय उभारणीसाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देण्यात येते. या योजनेला पूरक म्हणून महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत पात्र लाभार्थ्यांसाठी मार्जिन मनी सहाय्य योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीसाठीच्या सवलती घेण्यास पात्र असलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील नवउद्योजकांना उद्योग व्यवसाय सुरु करण्यासाठी आर्थिक मदत उपलब्ध करुन दिली जाते. योजनेच्या लाभासाठी प्रकल्प खर्चाच्या १० टक्के स्वहिस्स्याचा भरणा केल्यानंतर आणि संबंधित बँकेने स्टँड अप इंडिया योजनेअंतर्गत ७५ टक्के कर्ज मंजूर केल्यानंतर, उर्वरित १५ टक्के रक्कम फ्रंट एंड सबसिडी (मार्जिन मनी) स्वरुपात राज्य शासनामार्फत उपलब्ध करुन दिली जाते. अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील इच्छुक व पात्र नवउद्योजकांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित जिल्ह्यातील सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाशी संपर्क साधून योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन समाजकल्याण विभागाच्या प्रादेशिक उपआयुक्त श्रीमती वंदना कोचुरे यांनी केले आहे.

### सामाजिक न्याय दिनानिमित्त समता दिंडी; नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे

पुणे (दैनिक संध्या) : लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त २६ जून रोजी संपूर्ण जिल्ह्यात "सामाजिक न्याय दिन" साजरा करण्यात येणार आहे. सामाजिक न्याय विभागाच्या वतीने सकाळी ८.३० वाजता संविधान जनजागृती प्रभातफेरी व समता दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. ही समता दिंडी राजीव गांधी अॅकेडमी ऑफ ई-लर्निंग स्कूल अँड सायन्स ज्युनिअर कॉलेज, पर्वती पायथा येथून सुरू होऊन श्री शाहू मंदिर महाविद्यालय, पर्वती पायथा, पुणे येथे समाप्त होणार आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन नगरविकास मंत्री माधुरीताई मिसाळ यांच्या हस्ते होणार असून समाज कल्याण आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत. राजर्षी शाहू महाराज यांच्या कार्याचा प्रचार-प्रसार करण्यासाठी आयोजित या समता दिंडीत शासकीय-निमशासकीय कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते, महिला, ज्येष्ठ नागरिक, तृतीयपंथी नागरिक, विद्यार्थी, एनएसएस, एनसीसी स्वयंसेवक, युवक मंडळे व बचत गटांनी पारंपरिक वेशभूषेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सहायक आयुक्त समाज कल्याण, पुणे श्री. विशाल लोंढे यांनी केले आहे.

### वंदे मातरम च्या घोषणा देत तरुणांनी केले चापेकर बंधूंच्या शौर्याचे स्मरण

पुणे (दैनिक संध्या) : प्लेग कमिशनर रँडच्या अत्याचारांना प्रत्युत्तर देत २२ जून १८९७ रोजी गणेशखिंड येथे पराक्रम गाजविणाऱ्या चापेकर बंधूंच्या शौर्याचे स्मरण करत इतिहास प्रेमी मंडळाच्या वतीने शौर्य स्मरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ रस्त्यावरील चापेकर बंधूंच्या पुतळ्याजवळ झालेल्या या कार्यक्रमात देशभक्तीपर घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. इतिहास प्रेमी मंडळाच्या वतीने गेली २७ वर्षे हा दिवस शौर्य स्मरण दिन म्हणून साजरा केला जात आहे. यावेळी चापेकर बंधू आणि महादेव रानडे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मानवंदना देण्यात आली. त्यानंतर इतिहासतज्ज्ञ मोहन शेटे यांनी चापेकर बंधूंच्या क्रांतिकार्याचा इतिहास उपस्थितांसमोर उलगडला. मोहन शेटे म्हणाले, १८५७ च्या स्वातंत्र्यसमरात अपयश आल्यामुळे देशभर नैराश्याचे वातावरण निर्माण झाले होते. अशा काळात वासुदेव बळवंत फडके आणि लोकमान्य टिळक यांच्या विचारांनी प्रेरित होऊन चापेकर बंधूंनी कार्य सुरू केले. त्यांनी लिहिलेल्या कविता आणि आत्मचरित्रातून त्यांच्या प्रखर देशभक्तीचे दर्शन घडते. आपला राग केवळ रँड या एका व्यक्तीवर नसून संपूर्ण ब्रिटिश साम्राज्यावर आहे, हे दाखविण्यासाठी त्यांनी २२ जून हा राणी व्हिक्टोरियाच्या राज्यारोहणाचा हिरक महोत्सवी दिवस आपल्या पराक्रमासाठी निवडला. आपण रँडचा वध करणार असल्याचे आगाऊ पत्र पाठवून त्यांनी आपल्या निडर वृत्तीचे दर्शन घडविले. दामोदर चापेकर यांनी फासावर जाताना हातात भगवद्गीता घेतल्याने क्रांतिकार्याला प्रतिष्ठा प्राप्त झाली. एका कुटुंबातील तीन भाऊ फासावर जाण्याची घटना जागतिक इतिहासात दुर्मीळ असून ती प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाची बाब असल्याचेही त्यांनी सांगितले.

### पानशेत, वरसगाव-टेमघरमध्ये पावसाची हजेरी

पुणे (दैनिक संध्या) : खडकवासला धरण साखळीतील पानशेत, वरसगाव आणि टेमघर धरण क्षेत्रात मंगळवारी सकाळपासून पावसाने हजेरी लावल्याने धरण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या पावसामुळे धरण साठ्यात वाढ झालेली नसली तरी, पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना नागरिकांना या पावसामुळे दिलासा मिळाला आहे. खडकवासला पाटबंधारे विभागाच्या माहितीनुसार, मंगळवारी सायंकाळी पाच वाजेपर्यंत पानशेत येथे १७ मिलिमीटर, वरसगाव येथे १८ मिलिमीटर तर टेमघर येथे ४ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. मात्र, खडकवासला धरण परिसरात आज सायंकाळी पाच वाजेपर्यंत पाऊस झाला नाही. रिमझिम किरकोळ सरी पडल्या. परंतु रविवारी (दि. २१) खडकवासला धरण परिसरात अवघ्या एका तासात ३० मिलिमीटर पाऊस झाला होता. खडकवासला धरणात २३.४८ टक्के म्हणजे ०.४६ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध आहे. पानशेत धरणात १७.६३ टक्के (१.८८ टीएमसी) तर वरसगाव धरणात ११.६७ टक्के (१.५० टीएमसी) पाणीसाठा आहे. टेमघर धरण कोरडे झालेले आहे. सध्या खडकवासला धरण साखळीमध्ये नवीन पाण्याची आवक झालेली नसली, तरी पानशेत, वरसगाव आणि टेमघर परिसरात सुरू झालेला पाऊस कायम राहिल्यास पुढील काही दिवसांत धरणांच्या पाणीसाठ्यात समाधानकारक वाढ होण्याची शक्यता आहे.

## ऍक्सिस मॅक्स लाईफचा दावा निकाली काढण्याचा विक्रमी दर

पुणे (दै. संध्या)

ऍक्सिस मॅक्स लाईफ इन्शुरन्स लिमिटेडने (पूर्वाश्रमीची मॅक्स लाईफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड) आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये वैयक्तिक मृत्यू दाव्यांच्या निकाली काढण्याच्या प्रमाणात विक्रमी कामगिरी नोंदवली आहे. कंपनीने यावर्षी २०,५२९ वैयक्तिक मृत्यू दावे मंजूर करत तब्बल १,६४१ कोटी रुपयांची रक्कम वितरित केली आहे. यामुळे कंपनीचा वैयक्तिक मृत्यू दावा निकाली काढण्याचा दर ९९.८ टक्क्यांवर पोहोचला असून, हा आतापर्यंतचा सर्वोच्च स्तर आहे. मागील पाच वर्षांमध्ये कंपनीच्या दावा निकाली काढण्याच्या प्रमाणात सातत्याने वाढ झाली आहे. आर्थिक वर्ष २०२१ -२२ मध्ये हा दर ९९.३४ टक्के होता, जो २०२२ -२३ मध्ये ९९.५१ टक्के, २०२३ -२४ मध्ये ९९.६५ टक्के, २०२४-२५ मध्ये ९९.७ टक्के आणि २०२५-२६ मध्ये ९९.८ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. याचाच अर्थ आर्थिक वर्ष २०२१-२२ मधील ९९.३४ पासून वाढत आता ९९.८ टक्के हा नवीन बेंचमार्क स्थापित झाला आहे. कंपनीच्या स्थापनेपासून आजपर्यंत एकूण २,४३,५२४ पॉलिसींवरील मृत्यू दाव्यांपोटी ११,७७२.२१ कोटी रुपयांहून अधिक रक्कम अदा करण्यात आली आहे. याबाबत प्रतिक्रिया देताना ऍक्सिस मॅक्स लाईफचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सुमित मदान म्हणाले, "ऍक्सिस मॅक्स लाईफमध्ये आम्ही दावे जलदगतीने निकाली काढण्यासाठी प्रेडिक्टिव्ह ॲनालिटिक्स आणि डिजिटल फॉरेन्सिक्ससारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत आहोत. त्यातून आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील ९९.८ टक्के दावे निकाली काढण्याचा विक्रमी दर गाठण्याला चालना मिळाली आहे. हा दर केवळ एक आकडा नसून ग्राहकांनी आमच्यावर दाखवलेल्या विश्वासाचे दृढ प्रतीक आहे. प्रत्येक दाव्यामागे एका कुटुंबाची सुरक्षितता दडलेली असते आणि त्यांचे संरक्षण करण्याचा आम्हाला अभिमान आहे, याची तो आठवण करून देतो."




## समरसता लोककला संमेलन २०२६ चे २८ जून रोजी पुण्यात आयोजन

**संमेलनाच्या अध्यक्षपदी पद्मश्री रघुवीर खेडेकर यांची निवड**

- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन
- लोककला, साहित्य आणि संस्कृतीचा अनोखा संगम

पुणे (दै. संध्या)

लोककला, लोकपरंपरा आणि सांस्कृतिक वारसा जतन व संवर्धन करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि महाराष्ट्र राज्य समरसता साहित्य परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने 'समरसता लोककला संमेलन २०२६' चे आयोजन करण्यात आले आहे. या संमेलनाच्या अध्यक्षपदी लोककलावंत पद्मश्री रघुवीर खेडेकर यांची निवड करण्यात आली असून हे संमेलन २८ जून २०२६ रोजी होणार असल्याची माहिती आयोजकांच्या वतीने पत्रकार परिषदेत देण्यात आली. यावेळी धनंजय खुडे, विलास लांडगे, विजय मोरे, सुनील खंडाळे, रेश्मा मुसळे-परीतेकर, विकास माने, बाळासाहेब मालुसकर, जितेंद्र वाईकर, उपस्थित होते. समरसता लोककला संमेलन २०२६ चे उद्घाटन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार असून केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सांस्कृतिक मंत्री आशीष शेलार, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तर स्वागताध्यक्ष भाजपचे पुणे शहर अध्यक्ष धीरज घाटे आहेत.

या संमेलनात सकाळी 8 वाजता पुणे महानगरपालिका ते बालगंधर्व रंगमंदिर अशी लोककलावंतांची भव्य लोककला दिंडी निघणार आहे, त्यांचे उद्घाटन महापौर मंजूषा नांगपुरे यांच्या हस्ते होईल, या दिंडीत गोंधळी, वासुदेव, शाहिर, भारूड, लावणी, दशावतार, आदिवासी नृत्य, झाडीपटी यांसारख्या सुमारे २५० लोककलावंतांचा सहभाग असणार आहे.दुर्मीळ लोकवाद्यांचे प्रदर्शन बालगंधर्व रंगमंदिर, कला दालन येथे असणार आहे त्यांचे उद्घाटन सकाळी 9.30 वाजता राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या हस्ते होणार आहे. उद्घाटन सोहळ्या नंतर दुपारी 12 वाजता विशेष मुलाखत सत्रात पद्मश्री रघुवीर खेडेकर आणि लोककलावंत नंदेश उमप यांची मुलाखत अभिनेते संदीप पाठक घेणार आहेत. दुपारी 1 वाजता कवी संमेलनात तुकाराम ढोले, प्रा. वा. ना. आंधळे आणि कुमार चव्हाण हे सहभागी होणार आहेत. दुपारी 2 वाजता आयोजित चर्चासत्रात डॉ. प्रवीण चोले, डॉ. प्रशांत पाटील आणि अभिनेत्री जायमाल इनामदार सहभागी होणार आहेत.

संमेलनाचा समारोप मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपुरचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून त्यानंतर लोककला सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

## एकात्मिक किनारी सुरक्षा कायदा लागू करण्याची मागणी

पुणे (दै. संध्या)



२६/११ मुंबई दहशतवादी हल्ल्यानंतर देशातील किनारी सुरक्षेबाबत विविध उपाययोजना करण्यात आल्या असल्या तरी माहिती देवाणघेवाणीतील विलंब, विविध सुरक्षा यंत्रणांमधील समन्वयाचा अभाव आणि किनारी भागातील अपुरी देखरेख या समस्या अद्याप कायम असल्याचा दावा करत नागरिक सोशल फाउंडेशनने केंद्र व राज्य सरकारकडे "युनिफाइड कोस्टल सिक्युरिटी ॲक्ट" (Unified Coastal Security Act) लागू करण्याची मागणी केली आहे. अशी माहिती न नागरिक सोशल फाउंडेशन चे अँड .रोहन कानिटकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पत्रकार परिषदेला नागरिक सोशल फाउंडेशनचे विश्वस्त प्रीतम थोरवे, अँड .सर्वेश मेहेंदळे आदि मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना अँड . रोहन कानिटकर यांनी सांगितले की, २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यात १६६ नागरिकांचा मृत्यू झाला होता. त्यानंतरही किनारी सुरक्षेतील धोके कायम आहेत. दुसरीकडे, विकसित होत असलेल्या वाढवन बंदर प्रकल्पामुळे महाराष्ट्राचे सामरिक आणि आर्थिक महत्त्व मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. वाढवन बंदर कार्यान्वित झाल्यानंतर आंतरराष्ट्रीय मालवाहतूक, कंटेनर वाहतूक, सागरी व्यापार आणि किनारी आर्थिक क्रियाकलापांमध्ये मोठी वाढ अपेक्षित असल्याने सुरक्षा व्यवस्थाही अधिक सक्षम करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

अमेरिका, सिंगापूर आणि इस्रायलसारख्या देशांनी आधुनिक मेरिटाईम इंटेलिजन्स व कोस्टल सर्व्हेलन्स प्रणालीच्या माध्यमातून किनारी सुरक्षा मजबूत केली आहे. तसेच गुजरात, केरळ आणि तामिळनाडू या राज्यांनीही विविध यशस्वी किनारी सुरक्षा उपक्रम राबविले आहेत. त्याच धर्तीवर भारतात राष्ट्रीय स्तरावर एकात्मिक किनारी सुरक्षा नेटवर्क उभारण्याची गरज असल्याचे फाउंडेशनने स्पष्ट केले. राज्य शासनाकडे करण्यात आलेल्या मागण्यांमध्ये महाराष्ट्र किनारी सुरक्षा प्राधिकरणाची स्थापना, संपूर्ण किनारपट्टीवर रडार, ड्रोन, AIS, GPS, उपग्रह व कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित आधुनिक निगराणी प्रणाली विकसित करणे तसेच वाढवन बंदर, जेएनपीटी, मुंबई हाय, ओएनजीसी प्रतिष्ठाने आणि नौदल तळांसारख्या सामरिक सुविधांच्या संरक्षणासाठी बहुस्तरीय सुरक्षा आराखडा राबविण्याचा समावेश आहे.

केंद्र शासनाकडे करण्यात आलेल्या मागण्यांमध्ये "युनिफाइड कोस्टल सिक्युरिटी ॲक्ट" लागू करून भारतीय नौदल, तटरक्षक दल, मरीन पोलीस, सीमाशुल्क विभाग आणि बंदर प्राधिकरण यांच्यात एकात्मिक कायदेशीर चौकट निर्माण करणे, सर्व मासेमारी नौकांसाठी GPS, AIS आणि आधार-संलग्न बायोमेट्रिक नोंदणी बंधनकारक करणे तसेच संवेदनशील किनारी भागांना "हाय-सिक्युरिटी कोस्टल झोन" घोषित करून सागरी गुन्ह्यांसाठी कठोर शिक्षा आणि विशेष जलदगती न्यायालयांची स्थापना करणे यांचा समावेश आहे.

यावेळी भारतातील वाढते समुद्री सुरक्षा धोके, कोस्टल सिक्युरिटी व्यवस्थेतील त्रुटी आणि "युनिफाइड कोस्टल सिक्युरिटी सिस्टिम"ची गरज याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. वाढता समुद्री व्यापार, मोठे बंदर प्रकल्प, समुद्रमार्गे होणारी तस्करी, घुसखोरी आणि राष्ट्रीय सुरक्षेवरील संभाव्य धोके लक्षात घेता केंद्र व राज्य शासनाने तातडीने एकात्मिक आणि रिअल-टाईम किनारी सुरक्षा नेटवर्क उभारावे, अशी मागणी नागरिक सोशल फाउंडेशनने केली आहे.

## जगातील सर्वात मोठ्या ५२११ किलो पारद शिवलिंगाची भव्य प्राणप्रतिष्ठा



पुणे (दै. संध्या)

श्री साई शिव गंगा धाम, हरिद्वार येथे जगातील सर्वात मोठ्या ५२११ किलो वजनाच्या पारद शिवलिंगाची तीन दिवसीय भव्य प्राणप्रतिष्ठा भक्तिभाव, वैदिक मंत्रोच्चार आणि आध्यात्मिक वातावरणात संपन्न झाली. या ऐतिहासिक सोहळ्यास देशभरातील दोन हजारांहून अधिक भाविक, संत-महंत, साधक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थित राहून साक्षीदार होण्याचा मान मिळविला. या भव्य पारद शिवलिंगाची निर्मिती ध्यान गुरु रघुनाथ गुरुजी यांनी सुमारे दहा वर्षांच्या अखंड साधना, संशोधन आणि पारद विज्ञानाच्या सखोल अभ्यासातून केली आहे. शिवलिंगाच्या निर्मितीत पारा, चांदी, सोने तसेच १०८ प्रकारच्या औषधी वनस्पतींच्या अर्कांचा वापर करण्यात आला आहे. आध्यात्मिक क्षेत्रातील जाणकारांच्या मते, हे जगातील सर्वात मोठे पारद शिवलिंग असून भारतीय अध्यात्म, ध्यान परंपरा आणि पारद विज्ञानाचे अद्वितीय प्रतीक मानले जात आहे. गुरु गोरक्षनाथ महाराजांच्या परंपरेच्या प्रेरणेने, गिरनारचे पूज्य पीर योगी महंत सोमनाथ बापू यांच्या आशीर्वादाने आणि पद्मभूषण डॉ. विजय भटकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा भव्य सोहळा पार पडला. रघुनाथ गुरुजी यांनी सांगितले की, हे शिवलिंग केवळ धार्मिक श्रद्धेचे प्रतीक नसून ध्यान, आत्मचिंतन आणि सकारात्मक चेतना जागृत करणारे एक आध्यात्मिक केंद्र आहे. यापूर्वी २०१९ मध्ये त्यांनी सुमारे दहा हजार लोकांच्या सहभागासह भव्य अश्वमेध यज्ञाचे आयोजन करूनही विशेष लक्ष वेधले होते.

# गोसेवा व गोसंवर्धनासाठी कार्यरत गोशाळांना आर्थिक मदत

**ग्रंथ पारायण दिंडी आणि गीता धर्म मंडळ यांच्या वतीने मराठीत प्रथमच गोकथेचे आयोजन**




पुणे (दै. संध्या)

गोसेवा आणि गोसंवर्धनाचे कार्य निष्ठेने करणाऱ्या गोशाळा संचालकांचा सन्मान करत विविध गोशाळांना आर्थिक मदत व देणग्यांचे वितरण करून ग्रंथ पारायण दिंडी आणि गीताधर्म मंडळ यांनी गोसेवेप्रती बांधिलकी पार पाडली.

सदाशिव पेठेतील गीता धर्म मंडळात प्रथमच मराठीत आयोजित करण्यात आलेल्या चार दिवसीय गो कथा महोत्सवात ही मदत देण्यात आली. या गो कथेचे निरूपण ह.भ.प. परेश बुवा देवळणकर यांनी केले.

परेश बुवा देवळणकर म्हणाले, दुभती असताना गायीची सेवा अनेकदा दुधाच्या अपेक्षेने केली जाते. मात्र, भाकड गाईची सेवा करताना कोणताही आर्थिक लाभ मनात नसतो. त्यामुळे अशा निस्वार्थी सेवेचे पुण्य प्राप्त होते. भाकड गायीची सेवा केल्याने गोमातेबद्दलचा कृतज्ञतेचा भाव अधिक दृढ होतो.

ते पुढे म्हणाले, गोशाळेत जाऊन प्रत्यक्ष सेवा करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. भाकड गाईला कत्तलखान्यात जाण्यापासून वाचविणे हे अत्यंत पुण्याचे कार्य मानले गेले असून, अशा सेवेचे फळ एका अश्वमेध यज्ञाइतके असल्याचे शास्त्रात सांगितले आहे.

महोत्सवात गोशाळांचे व्यवस्थापन व गो सेवेचे कार्य निष्ठेने चालविणाऱ्या गोशाळा संचालकांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये स्वामी कृष्ण गोशाळा, खानापूर; गोमई गोशाळा, साधना आश्रम, गिवशी; मधुकर घुले यांची गोशाळा, कुळे (पौड-कोळवण रस्ता); पुनम राऊत यांची गोशाळा, पारगाव-खंडाळा तसेच धनकवडी लिमये यांची गोशाळा यांचा समावेश होता.

आयोजक वीरेंद्र कुंटे म्हणाले, भारतीय संस्कृतीत गोमातेला अत्यंत पूजनीय स्थान आहे. गोसेवा, गोसंवर्धन आणि गोदान या विषयांबाबत समाजात जनजागृती व्हावी, तसेच भाविकांमध्ये गोभक्तीची भावना दृढ व्हावी, या उद्देशाने प्रथमच मराठीत गोकथेचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला पुणेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### गायिका स्वप्ना रोकडे 'राष्ट्रीय कार्य दर्पण सन्मान' पुरस्काराने सन्मानित

मुंबई (दैनिक संध्या) : कार्य दर्पण यूट्यूब चॅनेल आणि महाराष्ट्र लोक कल्याणकारी सेवा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'राष्ट्रीय कार्य दर्पण गौरव संमेलन' सोहळ्यात सुप्रसिद्ध गायिका स्वप्ना रोकडे यांना संगीत क्षेत्रातील उल्लेखनीय योगदान आणि सामाजिक बांधिलकीची दखल घेत 'राष्ट्रीय कार्य दर्पण सन्मान पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. मुंबई मराठी पत्रकार संघाच्या पत्रकार भवन येथे झालेल्या या दिमाखदार कार्यक्रमात प्रख्यात संगीतकार कौशल इनामदार तसेच आयकर विभागाचे अतिरिक्त आयुक्त सुनील अगावणे (IRS) यांच्या हस्ते स्वप्ना रोकडे यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. स्वप्ना रोकडे यांनी आपल्या सुरेल गायकीच्या माध्यमातून संगीत क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे. केवळ मनोरंजनापुरते मर्यादित न राहता त्यांनी संगीताला समाजसेवेचे माध्यम बनवत अनेक अनाथालये, वृद्धाश्रम आणि सामाजिक संस्थांमध्ये विनामूल्य संगीत कार्यक्रमांचे आयोजन करून सामाजिक कार्यालाही हातभार लावला आहे. त्यांच्या कार्यक्रमांमुळे अनेक गरजू, निराधार आणि ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनात आनंदाचे क्षण निर्माण झाले आहेत. संगीत आणि समाजसेवा या दोन्ही क्षेत्रांतील त्यांच्या योगदानाची दखल विविध स्तरांवर घेण्यात आली असून त्यांना यापूर्वीही अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. 'नॅशनल अवॉर्ड', 'महाराष्ट्राची हिरकणी' यांसह विविध राज्यस्तरीय व राष्ट्रीय पुरस्कार त्यांच्या नावावर आहेत. त्यांच्या सातत्यपूर्ण कलासाधना, सामाजिक जाणीव आणि सांस्कृतिक क्षेत्रातील योगदानामुळे त्या अनेकांसाठी प्रेरणास्थान ठरल्या आहेत.

### जेएम फायनान्शियल म्युच्युअल फंडाकडून 'जेएम मल्टी ॲसेट ॲलोकेशन फंड' दाखल

पुणे (दैनिक संध्या) : भारतातील एकात्मिक आणि वैविध्यपूर्ण वित्तीय सेवा समूहांपैकी एक असलेल्या जेएम फायनान्शियल लिमिटेडची समूह कंपनी, जेएम फायनान्शियल ॲसेट मॅनेजमेंट लिमिटेडने, 'जेएम मल्टी ॲसेट ॲलोकेशन फंड' नावाच्या नवीन योजनेची मंगळवारी घोषणा केली. ही एक ओपन-एंडेड योजना असून, ती समभाग व समभागसंलग्न साधने (इक्विटी), स्थिर उत्पन्न रोखे (डेट व मनी मार्केट सिक्युरिटीज), सोने/चांदी संबंधित साधने आणि इतर एक्सचेंज ट्रेडेड कमोडिटी डेरिव्हेटिव्हजमध्ये गुंतवणूक करते. योजनेचा नवीन फंड ऑफर (एनएफओ) कालावधी २४ जून २०२६ ते ८ जुलै २०२६ पर्यंत या दरम्यान गुंतवणूकदारांसाठी खुला राहील. बाजार विविध चक्रांमधून जात असताना, बहु-मालमत्ता (मल्टी-ॲसेट) गुंतवणुकीसाठी संरचित दृष्टिकोन वापरून वाढ साधणे हा या योजनेचा उद्देश आहे. मालमत्ता वाटप हे दीर्घकालीन गुंतवणुकीच्या परिणामांचा एक महत्त्वाचा निर्धारक घटक मानले जाते. विविध मालमत्ता वर्ग हे बाजार चक्र आणि आर्थिक चक्रांनुसार वेगवेगळी कामगिरी करतात, त्यामुळे मालमत्ता वर्गांमध्ये विविधता आणणे ही गुंतवणूकदारांसाठी एक महत्त्वाची आणि लक्षणीय गोष्ट ठरते.

### महायुती सरकारची फसवी योजना! कर्जमाफी नव्हे, ही तर कर्जवसुली : अंबादास दानवे

मुंबई (दैनिक संध्या) : महायुती सरकारने जाहीर केलेली 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' ही प्रत्यक्षात शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी नसून कर्जवसुलीची योजना असल्याचा गंभीर आरोप ठाकरे शिवसेनेचे नेते तथा विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला. विधान परिषदेत सत्ताधारी पक्षाच्या प्रस्तावावर बोलताना त्यांनी सरकारच्या धोरणांवर जोरदार हल्लाबोल करत ही योजना शेतकऱ्यांची दिशाभूल करणारी असल्याचा दावा केला. दानवे म्हणाले की, सरकारने कर्जमाफीची मोठी घोषणा केली असली तरी योजनेत तब्बल १७ जाचक अटी व शर्ती घालण्यात आल्या आहेत. त्यामुळे राज्यातील बहुतांश शेतकरी या योजनेच्या लाभापासून वंचित राहण्याची शक्यता आहे. ही कर्जमाफी नसून शेतकऱ्यांना कर्जाच्या ओझ्यातच ठेवण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप त्यांनी केला. यावेळी त्यांनी सरकारच्या आश्वासनांवर टीका करताना, "लबाडाच्या घरची खीर कधी खायला मिळेल याची खात्री नसते, तशीच या सरकारच्या आश्वासनांची अवस्था झाली आहे," असा टोला लगावला. सरकार शेतकऱ्यांच्या नावाने घोषणा करते; मात्र प्रत्यक्ष लाभ देताना अनेक अडथळे उभे करते, असेही ते म्हणाले. महाविकास आघाडी सरकारच्या काळातील कर्जमाफीचा उल्लेख करताना दानवे म्हणाले की, २०१९ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील सरकारने कोणत्याही अटींशिवाय शेतकऱ्यांच्या खात्यात थेट कर्जमाफीची रक्कम जमा केली होती. त्याउलट सध्याच्या सरकारने कर्जमाफीला अटींच्या जाळ्यात अडकवून ठेवले आहे.

### निकृष्ट कोळसा पुरवठादारांना ब्लॅकलिस्ट करा; विजय वडेट्टीवार यांची जोरदार मागणी

मुंबई (दैनिक संध्या) : राज्यातील वाढती वीज मागणी, वीजटंचाई आणि औष्णिक वीज निर्मिती केंद्रांतील संच वारंवार बंद पडण्याच्या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत निकृष्ट दर्जाचा कोळसा पुरवठा करणाऱ्या कंपन्यांना ब्लॅकलिस्ट करण्याची जोरदार मागणी केली. तारांकित प्रश्नाच्या तासात हा मुद्दा उपस्थित करत त्यांनी निकृष्ट कोळसा पुरवठ्यामुळे वीज निर्मितीवर गंभीर परिणाम होत असल्याचा आरोप केला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही राज्याला पुरविला जाणारा काही कोळसा निकृष्ट दर्जाचा असल्याने वीज निर्मितीवर परिणाम होत असल्याची वस्तुस्थिती सभागृहात मान्य केली. वडेट्टीवार म्हणाले की, यंदाच्या उन्हाळ्यात राज्यात वीजेची मागणी विक्रमी पातळीवर पोहोचली होती. अशा परिस्थितीत महानिर्मितीच्या अनेक औष्णिक वीज निर्मिती संचांमध्ये तांत्रिक बिघाड होऊन ते बंद पडले. या बिघाडामागे निकृष्ट दर्जाचा कोळसा हे एक प्रमुख कारण असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे अशा कोळसा पुरवठादारांवर कठोर कारवाई करून त्यांना ब्लॅकलिस्ट करण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली. यावर उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, कोळसा पुरवठ्याच्या प्रश्नावर केंद्रीय कोळसा मंत्र्यांसोबत बैठक घेण्यात आली आहे. कोळशाचे योग्य सॅम्पलिंग आणि गुणवत्तेची खातरजमा करण्याबाबत राज्याची भूमिका केंद्र सरकारसमोर मांडण्यात आली आहे. तसेच भविष्यात काढण्यात येणाऱ्या निविदांमध्ये निकृष्ट कोळसा पुरवठा करणाऱ्या आणि व्यवस्थेचा गैरफायदा घेणाऱ्या कंपन्यांना सहभागी होता येणार नाही, यासाठी आवश्यक खबरदारी घेतली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. राज्यातील वाढत्या वीज मागणीचा विचार करता नवीन तंत्रज्ञानावर आधारित अधिक क्षमतेचे वीजनिर्मिती प्रकल्प उभारण्याबाबतही वडेट्टीवार यांनी प्रश्न उपस्थित केला. त्यावर सरकारकडून चंद्रपूर येथे ८०० मेगावॅट क्षमतेच्या सुपर क्रिटिकल वीज प्रकल्पाच्या उभारणीबाबत पाहणी सुरू असल्याची माहिती देण्यात आली. या विषयावर सभागृहातील अनेक सदस्यांनी उपप्रश्न उपस्थित करत राज्यातील वीज निर्मिती, कोळसा पुरवठा आणि भविष्यातील ऊर्जा नियोजनाबाबत सरकारकडे स्पष्टीकरण मागितले.

# प्रकल्पांसाठी नाबार्डच्या माध्यमातून निधी उभाणार : मंत्री विखे पाटील

**मुंबई (दै. संध्या) :**



महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रमातर्गत विविध प्रकल्पांसाठी नाबार्डच्या माध्यमातून निधी उपलब्ध करण्यात येईल. कार्यक्रमाच्या टप्पा दोन अंतर्गत होणाऱ्या या कामातून कृष्णा खोरे आणि गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळा अंतर्गत विविध सिंचन प्रकल्पातील कामांसाठी गती मिळेल असा विश्वास जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला.

मंत्रालयात जलसंपदा मंत्री विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. याप्रसंगी आमदार सत्यजित पाटील, आमदार अमोल जगताप, जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, सचिव संजय बेलसरे, कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक डॉ हनुमंत धुमाळ, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळचे कार्यकारी संचालक जयंत गवळी उपस्थित होते.

मंत्री विखे पाटील म्हणाले, महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रम राज्यातील पूर्ण झालेल्या १५५ जलसिंचन प्रकल्पांच्या कालवे व वितरण प्रणालीमध्ये सुधारणा करण्याच्या कामासाठी ५ हजार ३६ कोटी रुपये तरतुदीसाठी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. नाबार्ड च्या माध्यमातून निधी उपलब्धतेच्या या दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करून कामास गती दिली जाईल.

अपूर्ण सिंचन प्रकल्प तसेच पूर्ण प्रकल्पांच्या वितरण प्रणालीमध्ये सुधारणा करण्यासाठी या टप्प्यातील ७५०० कोटीपैकी गोदावरी व कृष्णा खोऱ्यात निधी उपलब्ध होणार असून सद्यस्थिती झालेला खर्चाबाबतचा आढावा घेण्यात आला. मंत्रिमंडळ बैठकीत यापूर्वीच महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रमांतर्गत निर्मित सिंचन क्षमता व प्रत्यक्ष सिंचन क्षमता यामधील तफावत दूर करण्याच्या दृष्टीने प्रथम टप्यात महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे अंतर्गत २१ प्रकल्पांना व गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर अंतर्गत १० प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

यामध्ये महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे आणि गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर एकूण ३१ प्रकल्पांच्या बाबत चर्चा करण्यात आली. गोदावरी उजवा तट कालवा प्रकल्पाचा टप्पा २ मधून टप्पा १ मध्ये समावेश करण्यात आला आहे. तसेच प्रवरा डावा व उजवा कालवा दुरुस्ती व भोजापूर मध्यम प्रकल्प या प्रकल्पांचा प्रथम टप्यात नव्याने समावेश करण्यात आला आहे अशी माहिती यावेळी देण्यात आली.

## महायुतीचे विधानपरिषदेत वर्चस्व कायम; १६ नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी

**मुंबई (दै. संध्या) :**



**गोकुळ गीतेंची शिवसेनेत एन्ट्री**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विधानपरिषद निवडणुकांमध्ये महायुतीने दणदणीत यश मिळवल्यानंतर विधानपरिषदेत सोमवारी नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी सोहळा उत्साहात पार पडला. या सोहळ्यात एकूण १६ सदस्यांनी आमदारपदाची शपथ घेतली. विशेष म्हणजे, नाशिक स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून अपक्ष म्हणून विजयी झालेले गोकुळ गीते यांनी विजयानंतर लगेचच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन शिवसेनेचे सहयोगी सदस्यत्व स्वीकारल्याने राज्याच्या राजकारणात नव्या चर्चांना सुरुवात झाली आहे.

२२ जून रोजी जाहीर झालेल्या विधानपरिषद निवडणुकीच्या निकालात महायुतीने १७ पैकी १६ जागांवर विजय मिळवत आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले. १७ जागांपैकी ६ उमेदवार यापूर्वीच बिनविरोध निवडून आले होते. उर्वरित ११ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत महायुतीने १० जागांवर विजय मिळवला. नाशिकमध्ये मात्र महायुतीचे उमेदवार नरेंद्र दराडे यांना अपक्ष उमेदवार गोकुळ गीते यांच्याकडून पराभव स्वीकारावा लागला.

नाशिकमधील या निकालामुळे महायुतीतील काही घटक पक्षांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू झाले होते. मात्र निकाल लागल्यानंतर अवघ्या काही तासांतच गोकुळ गीते यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेत शिवसेनेचे सहयोगी सदस्यत्व स्वीकारले. त्यामुळे अपक्ष म्हणून निवडून आलेले गीते प्रत्यक्षात महायुतीच्या गोटात दाखल झाल्याचे स्पष्ट झाले आहे. यामुळे विधानपरिषदेत महायुतीची ताकद आणखी वाढली आहे.

सोमवारी विधानपरिषद सभागृहात झालेल्या शपथविधी सोहळ्यात नव्या सदस्यांनी विधिमंडळाच्या कामकाजात सहभागी होण्याची शपथ घेतली. यामध्ये पुण्याचे विक्रम काकडे, रत्नागिरीचे अनिकेत तटकरे, साताऱ्याचे धैर्यशील कदम, सोलापूरचे राजेंद्र राऊत, नाशिकचे गोकुळ गीते यांच्यासह १६ सदस्यांचा समावेश होता.

या शपथविधी सोहळ्यात राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) खासदार सुप्रिया सुळे यांचे जावई अरुण लखाणी यांनीही विधानपरिषदेचे सदस्य म्हणून शपथ घेतली. यावेळी सुप्रिया सुळे यांची कन्या रेवती सुळे सभागृहात उपस्थित असल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळे या शपथविधी सोहळ्याकडे राजकीय वर्तुळासह अनेकांचे लक्ष लागले होते.

गेल्या दोन महिन्यांत राज्यात विधानपरिषदेसाठी दोन टप्प्यांत निवडणुका पार पडल्या. पहिल्या टप्प्यातील १० जागांसाठी झालेल्या निवडणुकीत सर्व उमेदवार बिनविरोध निवडून आले होते. त्यामध्ये महायुतीचे ९ आणि ठाकरे गटाच्या शिवसेनेचा १ उमेदवार विजयी झाला होता. त्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील १७ जागांसाठी निवडणूक झाली. या निवडणुकीतही महायुतीने जवळपास सर्व जागांवर विजय मिळवत आपले राजकीय वर्चस्व कायम राखले.

## ॲल्पेनलीबे आणि स्विगीने सुरू केले 'स्वीटेस्ट सिटी चॅलेंज'

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

परफेटी वॅन मेल इंडियाचा प्रसिद्ध ब्रँड ॲल्पेनलीबेने भारताचे आघाडीचे मागणीनुसार डिलिव्हरीचा असलेला प्लॅटफॉर्म 'स्विगी'सोबत (स्विगी लिमिटेड, NSE: SWIGGY / BSE: 544285) भागीदारी केली आहे. या दोन्ही आघाडीच्या कंपन्यांनी एकत्र येत ॲल्पेनलीबे स्वीटेस्ट सिटी चॅलेंज सुरू केले आहे, आजच्या आधुनिक आणि वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा हे आपले डिलिव्हरी पार्टनर्स आहेत, जे दररोज शहराच्या कानाकोपऱ्यात जाऊन अविरत सेवा देतात, याच भावनेला आणि त्यांच्या कष्टाला एक मानाचा मुजरा देण्यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. हे चॅलेंज पुणे, मुंबई, बेंगळुरू, कोलकाता, चेन्नई आणि दिल्लीसह भारतातील 20 हून अधिक शहरांमध्ये सुरू होणार आहे. अशा प्रकारचा हा एक आगळावेगळा उपक्रम असून, याद्वारे शहराशहरांमधील कोट्यवधी ग्राहकांना एक सुंदर आवाहन करण्यात आले आहे. ऑर्डर स्वीकारताना आपल्या




डिलिव्हरी पार्टनर्सप्रती कृतज्ञता, आपुलकी आणि आदराची एक छोटीशी भावना व्यक्त करण्यासाठी हे चॅलेंज ग्राहकांना प्रेरित करते. ॲल्पेनलीबेने जवळपास 28,000 डिलिव्हरी पार्टनर्सच्या माध्यमातून केलेल्या त्यांच्या ताज्या 'इंडियाज स्वीटनेस रिपोर्ट' सर्वेक्षणातून एक महत्त्वाची गोष्ट समोर आणली आहे. या सर्वेक्षणात डिलिव्हरी पार्टनर्सनी सांगितले की, दर 5 पैकी जवळपास 2 प्रसंगांमध्ये त्यांना ग्राहकांकडून मिळालेला अनुभव सरासरीपेक्षा कमी दर्जाचा होता, तसेच दर 4 पैकी 1 डिलिव्हरी अशी असते, जिथे ग्राहकाकडून स्वागत किंवा साधी दादही मिळत नाही. या निकालांवरून असे दिसून आले आहे की, दारावर येणाऱ्या डिलिव्हरी पार्टनर्ससोबत बहुतेक भारतीय ग्राहक चांगल्या आणि आदरानेच वागतात.

## सुमीत इंडस्ट्रीजची १९९.७५ कोटींच्या राइट्स इश्यूची घोषणा

**सुरत (दै. संध्या) :**

Sumeet INDUSTRIES LIMITED

**■ क्षमता विस्तार, कर्जफेड आणि सौर प्रकल्पासाठी निधी उभारणार**

एकात्मिक पॉलिस्टर उत्पादन क्षेत्रातील आघाडीची कंपनी सुमीत इंडस्ट्रीज लिमिटेडने व्यवसाय विस्तार आणि आर्थिक बळकटीसाठी १९९.७५ कोटी रुपयांच्या राइट्स इश्यूची घोषणा केली आहे. पात्र भागधारकांसाठी आणण्यात आलेल्या या इश्यूमधून उभारण्यात येणारा निधी उत्पादन क्षमता वाढ, कार्यकारी भांडवल मजबूत करणे, कर्जफेड आणि सौर ऊर्जा प्रकल्प उभारणीसाठी वापरण्यात येणार आहे. कंपनीच्या संचालक मंडळाने १६.८४ कोटी पूर्णतः भरलेल्या इक्विटी समभागांच्या माध्यमातून १९९.७५ कोटी रुपये उभारण्यास मंजुरी दिली आहे. प्रति समभाग ११.८६ रुपये या दराने हा इश्यू उपलब्ध असून प्रत्येक २५ समभागांमागे ८ राइट्स समभाग देण्यात येणार आहेत. रेकॉर्ड दिनांक १२ जून २०२६ असून इश्यू २२ जूनपासून खुला झाला आहे. हक्क हस्तांतरणाची अंतिम तारीख १५ जुलै तर इश्यू २० जुलै २०२६ रोजी बंद होणार आहे. राइट्स इश्यूमधून मिळणाऱ्या निधीपैकी सुमारे ४९.९० कोटी रुपये नकोडा लिमिटेडकडून अधिग्रहित करण्यात आलेल्या १.४० लाख टन वार्षिक क्षमतेच्या पॉलिस्टर चिप्स प्रकल्पाच्या एकत्रीकरणासाठी खर्च करण्यात येणार आहेत. सुरत येथील या प्रकल्पासाठी एकूण ९० कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित असून उर्वरित निधी अंतर्गत स्त्रोतांतून उभारला जाणार आहे. हा प्रकल्प आर्थिक वर्ष २०२७-२८ च्या पहिल्या तिमाहीत कार्यान्वित होण्याची अपेक्षा आहे.

निव्वळ उभारलेल्या निधीपैकी १०० कोटी रुपये कार्यकारी भांडवलासाठी, ४९.९० कोटी रुपये नकोडा मालमत्तेच्या एकत्रीकरणासाठी, २३ कोटी रुपये कर्जफेडीसाठी आणि २२ कोटी रुपये ६.५ मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पासाठी खर्च करण्यात येणार आहेत.

### जाहीर नोटीस

अॅड. के. जी. गोसावी

**जुन्नर येथील मे. एस.एस. जैन दिवाणी न्यायाधीश सो., यांचे कोर्टात**
**वारसा हक्काचा दाखला जाहिरनामा**

दिवाणी किरकोळ अर्ज. ५७/२०२६
निशाणी क्र. ६

१. श्रीमती अमीना सिददीक इनामदार
२. शहेजाद सिददीक इनामदार - अर्जदार
३. अल्ताश सिददीक इनामदार
४. बुशरा सिददीक इनामदार
सर्व १ते ४ रा. रूम न.६१०२,१
सुदर्शन निवास चाळ. न.५ अली तलावाजवळ
मालवणी मालाड, मुंबई (प) ४०००९५.

विरुध्द

कोणीही नाही - जाबदेणार

ज्यापेक्षा अर्जदार क्र १ ते ४ चे वडील आहे. अर्जदार क्र. १ यांचे पती म्हणजेच अर्जदार २ ते ४ याचे वडील कै. सिददीक इनामदार हे दिनांक २६/०८/२०१५ रोजी मुंबई येथे मयत झाले आहेत. हे बॉम्बे रेगयुलेशन कायदा VIII (२) १८२७ कायदयाप्रमाणे प्रथम वर्गातील वारस अर्जदार नं. १ ते ४ हे कायदेशीर वारस आहेत.

अर्जदार यांनी या न्यायालयात सदरहु अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारस असले बद्दल वारस प्रमाणपत्र मिळणेकामी सदरहू अर्जदार मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज केलेला आहे. जर कोणास सदर अर्जास हरकत घ्यावयाची असेल तर हया जाहिरनाम्याचे तारखेपासुन दिलेल्या तारखेच्या आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय अर्जदार याचे हक्काबददल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयत वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

पुढील नेमलेली तारीख २०/०७/ २०२६

आज दिनांक २२/०६/२०२६ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का

हूकूमावरुन,
सही/-
सहायक अधिक्षक, दिवाणी
न्यायालय, जुन्नर

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः गांव मौजे कांदळी ता. जुन्नर जि. पुणे येथील व आसपासचे लोकांस आमचे अशिलांनी समक्ष दिलेल्या कागदपत्रांवरुन व सांगितलेल्या माहितीवरुन या नोटीसीने जाहीर करण्यात येते की,

खाली परिशिष्ट- अ मध्ये वर्णन केलेली मिळकत ही ऋषिकेश विक्रम भोर यांचे मालकी वहीवाटीची असुन, ७/१२ ला सरकार दप्तरी मालक सदरी फेरफार नोंद नं. ५०४० ने ऋषिकेश विक्रम भोर यांचे स्वतंत्र नावाने आहे व प्रत्यक्ष स्वतंत्रपणे मालकी हक्काने ताबेवहीवाटीस आहे.

तसेच परिशिष्ट - ब मध्ये वर्णन केलेली मिळकत ही विक्रम बाळू भोर यांचे खरेदी मालकी वहीवाटीची असुन, ७/१२ ला सरकार दप्तरी मालक सदरी फेरफार नोंद नं. १५७४ ने विक्रम बाळू भोर यांचे स्वतंत्र नावाने आहे व प्रत्यक्ष स्वतंत्रपणे मालकी हक्काने ताबेवहीवाटीस आहे.

सदर परिशिष्ट अ मिळकतीचे विद्यमान मालक ऋषिकेश विक्रम भोर व परिशिष्ट- ब मिळकतीचे विद्यमान मालक विक्रम बाळू भोर यांनी सदर मिळकत निर्वेध, निजोखमी बोजारहीत असल्याची खात्री व भरोसा आमचे अशिलांना देवुन, सदर मिळकत आमचे अशिलांना कायम खुश खरेदी देण्याचे मान्य व कबुल केले आहे व त्यानुसार आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा दस्त नोंदविणार आहेत.

तरी या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या परिशिष्ट -अ मिळकतीचे विद्यमान मालक ऋषिकेश विक्रम भोर व परिशिष्ट ब मिळकतीचे विद्यमान मालक विक्रम बाळू भोर यांचे व्यतिरिक्त व्यतिरिक्त सदर मिळकतीशी अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा दावा, मालकी हक्क, हितसंबंध अगर ताबेवहीवाट असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन आठ दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्रांनिशी आमचे खाली नमूद पत्त्यावर लेखी कळवून, सदर मिळकतीशी असलेल्या कायदेशीर हक्काबाबत आमचे अशिलांची खात्री पटवुन दयावी. अन्यथा सदर मिळकतीशी कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध अगर ताबेवहीवाट नाही व असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडुन दिला आहे व सदर मिळकत ही पुर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असे समजुन, आमचे अशिल सदर मिळकतीबाबत खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसवणुक होवु नये म्हणुन ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे.

**परिशिष्ट - अ**

मिळकतीचे वर्णनः- तुकडी पुणे, पोट तुकडी व तालुका जुन्नर मे. दुय्यम निबंधक सो. व पंचायत समिती जुन्नर पैकी गाव मौजे कांदळी ग्रामपंचायत हद्दीतील मिळकत -

| खाते नं. | गट नं. | क्षेत्र हे आर | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| २१९५ | १०१६ | ०/२५ | ०/४७ |

यांसी चतुःसीमा खालीलप्रमाणे -

| पूर्व | पश्चिम | दक्षिण | उत्तर |
|---|---|---|---|
| गट नं. १०१७ | येडगाव - धरण रस्ता | गट नं. १०१५ | रामदास मोरे यांचे क्षेत्र |

**परिशिष्ट - ब**

मिळकतीचे वर्णनः- तुकडी पुणे, पोट तुकडी व तालुका जुन्नर मे. दुय्यम निबंधक सो. व पंचायत समिती जुन्नर पैकी गाव मौजे कांदळी ग्रामपंचायत हद्दीतील मिळकत -

| गट नं. | क्षेत्र हे आर | आकार रु. पै. |
|---|---|---|
| १०१५ | ०/२८ | ०/५५ |

या जमिनी पैकी विक्रम बाळू भोर यांचे क्षेत्र खालीलप्रमाणे -

| खाते नं. | गट नं. | क्षेत्र हे आर | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ४८४ | १०१५ | ०/१३ | ०/२५ |

यांसी चतुःसीमा खालीलप्रमाणे -

| पूर्व | पश्चिम | दक्षिण | उत्तर |
|---|---|---|---|
| गट नं. १०१७ | येडगाव - धरण रस्ता | अमीन मदार यांचे क्षेत्र | गट नं. १६ |

शिक्का

अॅड. श्रीनाथ सदाशिव काळे
अॅडव्होकेट
बी.एस. एल, एलएल.बी.
ऑफिस नं. २०६, दुसरा मजला, धर्मराज प्लाझा,
पुणे- नाशिक हायवे, नारायणगाव,
ता. जुन्नर, जि. पुणे ४१०५०४

### पुणे महानगरपालिका, पुणे

**निविदा प्रक्रिया कक्ष पाणीपुरवठा विभाग**
**निविदा जाहिरात - नविन कामे**

विक्री कालावधी दिनांक : दि. २४/०६/२०२६ ०९:०० सकाळी ते दि. ०३/०७/२०२६ १४:३० दुपारी पर्यंत
स्वीकृती दिनांक : दि. २४/०६/२०२६ ०९:०० सकाळी ते दि. ०३/०७/२०२६ १४:३० दुपारी पर्यंत
तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक : ०६/०७/२०२६ १५:०० दुपारी

| निविदा क्रमांक | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रू. | अंदाजित पुर्व गणित रक्कम रू. | बयाणा रक्कम रू. | कामाची मुदत (महिने) | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| PMC/WATER_SUPPLY/2026/07 | पाणीपुरवठा | कात्रज चौकामधील राजीव गांधी पंपिंग स्टेशन शेजारी टँकर भरणा केंद्राची उभारणी करणे करिता १ लक्ष लिटर क्षमतेची RCC (ESR) बांधणे. | रू. १३५९/- | रू. २४५७५७२/- | रू. २४५७६/- | १२ | दीपक रामचंद्र रोमन ९७८०५९७४६८ |

अ) सदर कामाबाबत निविदा अटी/शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृत सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाइन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.
ब) निविदा प्रक्रियाच्या शेवटच्या दिवशी संच प्राप्त न झाल्यास व स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाइन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्व जबाबदारी टेंडरदाराची राहील.
क) ऑनलाईन निविदा प्रक्रिया बाबतची संपूर्ण माहिती टेंडर सेल विभाग पुणे म.न.पा. येथे मिळेल.
ड) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि)/३२, दि.२२.०४.२०१६ नुसार बयाणा रक्कम ECS / RTGS / NEFT सुविधेमार्फतच स्वीकारण्यात येणार आहे.

सही/-
Nitin Khude (Prabhari)
कार्यकारी अभियंता
पाणीपुरवठा
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र. १/२५६ दि. २३/६/२०२६

## थोडक्यात पण महत्वाचे...



### आषाढी वारी पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर सुविधांच्या नियोजनाला गती

■ वारकऱ्यांना दर्जेदार सेवा देण्यासाठी विविध संस्थांशी महापालिकेचा समन्वय

पिंपरी (दैनिक संध्या) : आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर वारकरी बांधवांना आरोग्य, स्वच्छता आणि इतर मूलभूत सुविधा सुरळीतपणे उपलब्ध करून देण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने विविध स्वयंसेवी संस्था, सामाजिक संघटना तसेच शैक्षणिक संस्थांच्या प्रतिनिधींची समन्वय बैठक आयोजित केली. उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांच्या अध्यक्षतेखाली पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात ही बैठक पार पडली. यावेळी वारीदरम्यान वारकऱ्यांसाठी उभारण्यात येणाऱ्या मोफत आरोग्य तपासणी केंद्रांचे नियोजन, स्वच्छता व्यवस्थापन, सुलभ शौचालयांची उपलब्धता, सुरक्षित पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच विविध स्वयंसेवी संस्थांच्या सहभागातून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. वारकरी बांधवांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये, यासाठी महापालिका आणि स्वयंसेवी संस्थांमधील समन्वय अधिक प्रभावी करण्यावर भर देण्यात आला. याशिवाय वारी मार्गावर उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या विविध सेवा-सुविधांचा आढावा घेण्यात आला. तसेच संबंधित विभागांना आवश्यक सूचना देऊन नियोजन वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. वारीदरम्यान वारकऱ्यांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सर्व संस्थांनी महापालिकेला सहकार्य करण्याची तयारी दर्शविली असून, महापालिका व संस्था यांच्या समन्वयातून सेवा अधिक राबविण्याचा निर्धार या बैठकीत व्यक्त करण्यात आला.

### स्वच्छता नियमभंगाविरोधात महापालिकेची मोहीम; 44 हजारांचा दंड वसूल



पिंपरी (दैनिक संध्या) : स्वच्छता नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात पिंपरी चिंचवड महापालिकेने धडक कारवाई मोहीम हाती घेतली असून, विविध भागांत केलेल्या कारवायांमधून ४४ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. रस्त्यावर कचरा टाकणे, कचरा जाळणे, बंदी असलेल्या प्लास्टिकचा वापर करणे तसेच सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता करणे, अशा प्रकारांवर ही कारवाई करण्यात आली. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभाग आणि ग्रीन मार्शल पथकाने विविध भागांत तपासणी मोहीम राबविली. रहाटणी-थेरगाव परिसरात सार्वजनिक रस्त्यावर कचरा टाकणाऱ्या एका टेम्पोवर कारवाई करून पाच हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. विशेष तपासणीदरम्यान संबंधित वाहनातून कचरा टाकला जात असल्याचे निदर्शनास आल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. रावेत परिसरात एका व्यावसायिक आस्थापनाकडून कचरा जाळला जात असल्याचे आढळून आले. कचरा जाळल्यामुळे होणारे वायू प्रदूषण आणि त्याचे आरोग्यावर होणारे परिणाम लक्षात घेऊन संबंधित आस्थापनास २५ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला.

### पावसाळी अधिवेशनात आमदार सुनील शेळके यांची तालिका अध्यक्षपदी निवड



मावळ (दैनिक संध्या) : मावळचे आमदार सुनील शेळके यांची महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनासाठी तालिका अध्यक्षपदी निवड झाल्याने मावळ तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या या निवडीबद्दल राजकीय, सामाजिक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आमदार सुनील शेळके हे मावळ मतदारसंघातून सलग दोन वेळा प्रचंड मताधिक्याने निवडून आलेले लोकप्रतिनिधी आहेत. २०१९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून उमेदवारी मिळाल्यानंतर त्यांनी मावळच्या राजकारणात नवा अध्याय सुरू केला. त्यानंतर २०२४ च्या निवडणुकीतही त्यांनी एक लाखांहून अधिक मताधिक्याने विजय मिळवत आपला जनाधार अधिक भक्कम असल्याचे सिद्ध केले. मावळ तालुक्यात विकासकामांचा मोठा धडाका लावणारे आमदार म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. रस्ते, पाणीपुरवठा योजना, आरोग्य सुविधा, शैक्षणिक विकास, पर्यटनवाढीसाठी विविध प्रकल्प तसेच लोणावळा परिसरातील स्कायवॉकसारख्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांच्या माध्यमातून त्यांनी मावळच्या विकासाला गती दिली आहे. त्यामुळेच त्यांना ‘विकासपुरुष’ म्हणूनही संबोधले जाते. विधिमंडळातील तालिका अध्यक्षपद हे अत्यंत महत्त्वाचे आणि जबाबदारीचे मानले जाते. सभागृहाचे कामकाज सुरळीत व शिस्तबद्ध पद्धतीने चालावे यासाठी अध्यक्ष किंवा उपाध्यक्षांच्या अनुपस्थितीत तालिका अध्यक्ष सभागृहाचे संचालन करतात. सभागृहातील चर्चा, नियमांचे पालन, सदस्यांना बोलण्याची संधी देणे तसेच कामकाजाचे प्रभावी व्यवस्थापन करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी या पदावर असते. त्यामुळे हे पद लोकप्रतिनिधीच्या संसदीय अनुभवाची, अभ्यासू वृत्तीची आणि नेतृत्वक्षमतेची दखल घेणारे मानाचे पद समजले जाते. आमदार सुनील शेळके यांच्या या निवडीमुळे मावळ तालुक्याच्या राजकीय प्रतिष्ठेत भर पडली असून राज्याच्या विधिमंडळात मावळच्या नेतृत्वाला विशेष स्थान मिळाल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे. त्यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरांतून शुभेच्छा देण्यात येत असून मावळ तालुक्यात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

### महापालिका प्रशासकीय भवन अन् ‘अजित सृष्टी’चे एकत्रित लोकार्पण होणार..!

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नवीन मुख्य प्रशासकीय इमारतीच्या दुसऱ्या टप्प्यातील कामामध्ये दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या स्मरणार्थ उभारण्यात येणाऱ्या ‘अजितसृष्टी’ या प्रकल्पाचा समावेश करावा, अशी आग्रही मागणी भोसरीचे भाजपा आमदार महेश लांडगे यांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे. नवीन प्रशासकीय भवन आणि ‘अजितसृष्टी’ या दोन्ही प्रकल्पांचे काम पूर्ण करून त्यांचे एकत्रित लोकार्पण व्हावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे. भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना यासंदर्भात एक सविस्तर पत्र दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, सध्या पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे काम प्रगतीपथावर आहे. याच इमारतीच्या आवारात दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या कार्याची स्मृती जपणारी ‘अजित सृष्टी’ उभारण्याचा निर्णय यापूर्वीच घेण्यात आला आहे. मात्र, आता प्रशासकीय भवनाच्या दुसऱ्या टप्प्यातील कामाची निविदा प्रसिद्ध करताना त्यात ‘अजित सृष्टी’ प्रकल्पाचाही समावेश करणे अपेक्षित असल्याचे आमदार लांडगे यांनी निदर्शनास आणून दिले आहे.

# अवैध मालवाहतूक करणाऱ्या ट्रॅव्हल्सचे थेट परमीट रद्द होणार



आमदार शंकर जगताप

## परिवहन मंत्र्यांची विधानसभेत मोठी घोषणा; गाड्यांच्या टपावरील पार्सल वाहतुकीला चाप

■ 'आरटीओ'ची मोठी मोहीम: १ लाखांहून अधिक वाहनांवर कारवाई

पिंपरी (दै. संध्या)

खाजगी प्रवासी आणि लक्झरी बसेसच्या टपावर तसेच अंतर्गत भागात बेकायदेशीरपणे केली जाणारी 'कुरिअर पार्सल'ची वाहतूक रोखण्यासाठी राज्य सरकारने आता अत्यंत कठोर भूमिका घेतली आहे. केवळ दंड वसूल करून नियम मोडणारे वाहनचालक सुधारत नसल्याने, यापुढे वारंवार दोषी आढळणाऱ्या वाहनांचा परवाना (परमिट) थेट रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांनी विधानसभेत विचारलेल्या तारांकित प्रश्नाला उत्तर देताना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी ही महत्त्वपूर्ण माहिती दिली.

मोटार वाहन कायदा १९८८ च्या कलम ८६ अंतर्गत पहिल्या तीन गुन्ह्यांपर्यंत परवाना निलंबन आणि चौथ्या गुन्ह्यात थेट परवाना रद्द (कॅन्सल) करण्याची कडक कारवाई करण्याचे आदेश प्रादेशिक परिवहन (आरटीओ) अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत, अशी घोषणा परिवहन मंत्र्यांनी विधानसभेत केली. या प्रश्नाच्या अनुषघाने बोलताना आमदार शंकर जगताप म्हणाले, अनेक खाजगी बसेसमध्ये डिकीसह थेट बसेसच्या वरच्या टपावर मोठ्या प्रमाणावर व्यावसायिक माल आणि अवजड पार्सल लादले जातात. प्रवासी वाहतुकीच्या मूळ संरचनेनुसार अशा प्रकारे टपावर क्षमतेपेक्षा जास्त माल वाहून नेणे बेकायदेशीर आहे. यामुळे बसच्या ब्रेकिंग सिस्टीम, टायर आणि सस्पेन्शनवर प्रचंड ताण पडतो. घाटांमध्ये किंवा लांब पल्ल्याच्या प्रवासात भीषण अपघातांचा धोका निर्माण होतो. या गंभीर समस्येवर बोट ठेवत, दोषींवर सातत्याने कारवाई करूनही हे प्रकार सुरूच असल्याचे आमदार जगताप यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले की, वारंवार नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ट्रॅव्हल्स मालक आणि चालकांवर यापुढे

"प्रवाशांच्या जीवाशी खेळून खाजगी बसेसच्या टपावर आणि डिकीमध्ये होणारी बेकायदेशीर व्यावसायिक मालवाहतूक हा अत्यंत गंभीर विषय आहे. केवळ दंड भरून हे वाहतूकदार पुन्हा तोच गुन्हा करत होते. त्यामुळेच विधानसभेत हा तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. यावर परिवहन मंत्र्यांनी पहिल्या तीन गुन्ह्यांसाठी परवाना निलंबन आणि चौथ्या गुन्ह्यात थेट परवाना (परमिट) रद्द करण्याची जी ऐतिहासिक घोषणा केली आहे, त्याचे मी स्वागत करतो. या कडक निर्णयामुळे अवैध पार्सल वाहतुकीला चाप बसेल आणि प्रवाशांचा प्रवास सुरक्षित होईल. आरटीओ अधिकाऱ्यांनी या आदेशाची कडक अंमलबजावणी करावी, हीच आमची भूमिका आहे."

- आमदार शंकर जगताप, (चिंचवड विधानसभा मतदारसंघ)

दंडाव्यतिरिक्त कठोर प्रशासकीय कारवाई केली जाईल. त्यासाठी एक 'ॲक्शन प्लॅन' करण्यात आला आहे. यामध्ये पहिला गुन्हा: परवाना (परमिट) ७ ते १० दिवसांसाठी निलंबित होणार. दुसरा गुन्हा: परवाना १० ते १५ दिवसांसाठी निलंबित होणार. तिसरा गुन्हा: परवाना १५ ते ३० दिवसांसाठी निलंबित होणार. चौथा गुन्हा केल्यानतर परवाना थेट कायमचा रद्द केला जाणार आहे. अवैध मालवाहतूक करणाऱ्या बसेसवर आरटीओच्या वायुवेग पथकांनी धडक मोहीम सुरू ठेवली आहे. परिवहन विभागाने दिलेल्या अधिकृत माहितीनुसार आतापर्यंत तब्बल १,लाख ,८४८ वाहनांवर विभागाने धडक कारवाई केली आहे.यामध्ये सातत्याने नियम मोडणाऱ्या ५,७२८ दोषी वाहनांचा समावेश आहे. त्यांच्याकडून ४ कोटी ६१ लाख ७८ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला. त्यानंतर, १ एप्रिल ते ३१ मे २०२६ या अवघ्या दोन महिन्यांच्या काळात १,४५४ बसेसवर कारवाई करून ७८ लाख १८ हजार रुपये इतका दंड वसूल झाला. आतापर्यंत एकूण ७,१८२ दोषी बसेसवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून, त्याद्वारे एकूण ५ कोटी ३९ लाख ९६ हजार रुपये इतका महसूल दंड स्वरूपात वसूल करण्यात आला आहे.

## आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योगाभ्यास कार्यक्रम संपन्न

पिंपरी (दै. संध्या)



आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि योग विद्या धाम, निगडी यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष योगाभ्यास कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आला. ‘एक पृथ्वी, एक आरोग्य’ या संकल्पनेवर आधारित या कार्यक्रमात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून योगाभ्यास केला. कार्यक्रमाची सुरुवात क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीचे सभापती कैलास कुटे आणि अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. या कार्यक्रमास नगरसेविका अनुराधा गोरखे,उपआयुक्त पंकज पाटील,क्रीडा अधिकारी दिपक कन्हेरे,प्रशासन अधिकारी दत्तात्रय सूर्यवंशी,योग विद्या धाम, निगडीचे प्रमुख प्रमोद निफाडकर, योगिनीज योगा क्लासेसच्या संचालिका योगिता तरडे तसेच छत्रपती पुरस्कार विजेत्या शीतल मारणे उपस्थित होते. त्यानंतर ओंकार उच्चारण व प्रार्थनेद्वारे योग सत्राला प्रारंभ करण्यात आला. या कार्यक्रमात योगाचे महत्त्व, निरोगी जीवनासाठी योगाची आवश्यकता तसेच शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक आरोग्य जपण्यात योगाचे योगदान याविषयी मान्यवरांनी मार्गदर्शन केले. यावेळी योगाचा जागतिक स्तरावर प्रसार करण्यासाठी आणि भारतीय संस्कृतीतील या अमूल्य परंपरेला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळवून देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या प्रयत्नांचेही यावेळी स्मरण करण्यात आले.

योग विद्या धामच्या वतीने विविध योगासनांची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. उपस्थित मान्यवर तसेच नागरिकांनीही योगाभ्यासात सक्रिय सहभाग घेतला. नियमित योगाभ्यासामुळे निरोगी आणि संतुलित जीवनशैली घडण्यास मदत होते, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

योग हा भारतीय संस्कृतीचा अमूल्य वारसा असून निरोगी जीवनाचा भक्कम पाया आहे. प्रत्येक नागरिकाने योगाला आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवावे, असे आवाहन कैलास कुटे यांनी यावेळी केले. तर “योग” ही केवळ व्यायाम पद्धती नसून शरीर, मन आणि बुद्धी यांचा समतोल साधणारी जीवनशैली आहे. नियमित योगाभ्यासामुळे नागरिकांचे आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होते. प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात योगाचा समावेश करून निरोगी समाज घडविण्यास हातभार लावावा असे अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम म्हणाले.

## केतन अग्रवालचा खून; फोटो काढताना केतन घसरला नाही तर दरीत ढकललं

पिंपरी (दै. संध्या)

प्रसिद्ध लोहगड किल्ल्यावर ट्रेकिंग दरम्यान दरीत कोसळून झालेल्या व्यावसायिक केतन अग्रवाल या तरुणाच्या मृत्यू प्रकरणाचा लोणावळा ग्रामीण पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. सुरुवातीला हा अपघात वाटत असला, तरी सिया गोयल या केतनच्या होणाऱ्या पत्नीनेच आपल्या प्रियकराच्या मदतीने केतनचा काटा काढल्याचा धक्कादायक खुलासा तपासात झाला आहे. या हाय-प्रोफाइल घटनेमुळे पुणे आणि पिंपरी-चिंचवडच्या व्यापारी वर्तुळात खळबळ उडाली असून पोलिसांनी केतनच्या होणाऱ्या पत्नीची आणि तिच्या प्रियकराला चौकशीसाठी ताब्यात घेतलं आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मृत केतन अग्रवाल हा नामवंत व्यावसायिक विशाल अग्रवाल यांचा मुलगा होता. त्याचा विवाह मार्केटयार्डातील मसाल्यांचे मोठे व्यापारी गोयल यांची कन्या सिया गोयल हिच्याशी निश्चित झाला होता. जयपूर येथे अत्यंत थाटामाटात हा विवाह सोहळा पार पडणार होता आणि त्यासाठी दोन विमानेही बुक करण्यात आली होती. मात्र, सियाला केतनसोबत लग्न करायचे नव्हते. या विवाहासाठी तिचा विरोध असल्याने तिने केतनला कायमचे वाटेतून हटवण्याचा भयानक कट रचला. गुरुवारी सियाचा वाढदिवस होता. याचेच निमित्त साधून केतन आणि सिया हे दोघे लोहगडावर ट्रेकिंगसाठी गेले होते. तिथे फोटोसाठी पोज देत असताना केतनचा पाय घसरला आणि तो दरीत पडला, असा बनाव सुरुवातीला रचण्यात आला होता. मात्र, लोणावळा ग्रामीण पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण आणि सखोल तपास केला असता हा घातपात असल्याचे समोर आले.

## पिंपरी-चिंचवड पोलीस मुख्यालय, परेड ग्राउंड ताथवडेत होणार..!

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे मुख्यालय, परेड ग्राऊंड आणि इतर अनुषंगिक कार्यालयांसाठी ताथवडे येथील पशुसंवर्धन विभागाच्या अधिपत्याखालील २० हेक्टर जमीन हस्तांतरित करण्याचा मार्ग मोकळा झाला असून, यासंदर्भातील शासन निर्णय येत्या काही दिवसांत जारी होणार असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. तसेच, याबाबत महिन्याभरात मंत्रिमंडळात आवश्यक निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासनही त्यांनी दिले. पिंपरी-चिंचवड शहराच्या वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनासाठी स्वतंत्र आणि सुसज्ज मुख्यालय उभारण्याची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित होती. या प्रश्नाचा सातत्याने पाठपुरावा आमदार महेश लांडगे यांनी राज्य शासनाकडे केला होता. त्यांच्या प्रयत्नांना आता यश येताना दिसत आहे. याबाबत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली. यावेळी पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, मंत्रिमंडळाच्या दि. १० ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या बैठकीत ताथवडे येथील वळुभाता प्रक्षेत्रातील एकूण ६७.९४ हेक्टर क्षेत्रापैकी २० हेक्टर जमीन पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे मुख्यालय, परेड ग्राऊंड व इतर आवश्यक कार्यालयांसाठी हस्तांतरित करण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार गृह विभागाने महसूल विभागाकडे आवश्यक कार्यवाहीसाठी प्रस्ताव पाठविला आहे.

“निरोगी आरोग्य व वृद्धत्वासाठी योग” या संकल्पनेवर पिंपरी चिंचवड

## महानगरपालिकेच्या शाळांमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या वतीने "निरोगी वृद्धत्वासाठी योग" या यंदाच्या संकल्पनेनुसार आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. महानगरपालिकेच्या ११० प्राथमिक व २४ माध्यमिक अशा एकूण १३४ शाळांमधील विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सामूहिक योगाभ्यास करून या उपक्रमात सहभाग नोंदविला.

विशेष बाब म्हणजे, आंतरराष्ट्रीय योग दिन यंदा रविवारी आला असतानाही विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने शाळांमध्ये उपस्थिती दर्शविली. सुट्टीचा दिवस असूनही विद्यार्थ्यांनी स्वखुशीने सहभाग नोंदवत योगाबद्दलची जागरूकता आणि उत्साह दाखवून दिला.

योग हा भारतीय संस्कृतीचा अमूल्य वारसा असून शारीरिक, मानसिक आणि भावनिक आरोग्य जपण्यासाठी तो अत्यंत उपयुक्त आहे. यंदाच्या "निरोगी वृद्धत्वासाठी योग" या संकल्पनेतून विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासूनच योगाची सवय निर्माण होऊन आयुष्यभर निरोगी जीवनशैली अंगीकारण्याचा संदेश देण्यात आला.

महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये सकाळी योग सत्रांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये सूर्यनमस्कार, विविध योगासने, प्राणायाम तसेच ध्यानधारणा यांचे प्रात्यक्षिक करण्यात आले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना नियमित योगाभ्यासाचे महत्त्व समजावून सांगत योगामुळे शरीराची लवचिकता वाढते, मानसिक ताण कमी होतो, एकाग्रता सुधारते आणि निरोगी जीवन जगण्यास मदत होते, अशी माहिती दिली.

यावेळी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध योगासनांचे सादरीकरण केले. अनेक शाळांमध्ये योगविषयक मार्गदर्शन, प्रबोधनपर उपक्रम आणि आरोग्यविषयक चर्चांचे आयोजनही करण्यात आले.

योग ही भारताने जगाला दिलेली अमूल्य देणगी आहे. 'निरोगी वृद्धत्वासाठी योग' या संकल्पनेतून प्रत्येक नागरिकाने नियमित योगाभ्यासाचा संकल्प करणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांनी रविवारीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आरोग्याबाबतची जागरूकता दाखविली आहे. विद्यार्थ्यांमध्ये निरोगी जीवनशैलीची सवय रुजविण्यासाठी असे उपक्रम महत्त्वाची भूमिका बजावतात.

# भारतातील सर्वात मोठ्या सायकल वारीचा मान

## इंडो अथलेटिक्स सोसायटीची १० वी पुणे–पंढरपूर सायकल वारी उत्साहात संपन्न २३५० सायकलस्वारांचा विक्रमी सहभाग

पिंपरी (दै. संध्या)




संपूर्ण भारतातील क्रीडा व आरोग्य क्षेत्रात कार्यरत असलेल्या इंडो अथलेटिक्स सोसायटीतर्फे आयोजित करण्यात आलेली दहावी पुणे–पंढरपूर सायकल वारी शनिवारी (२० जून) मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाली. देहू येथील गाथा मंदिरातून पहाटे प्रस्थान केलेल्या या वारीत तब्बल २३५० सायकलस्वारांनी सहभाग नोंदवत २३५ किलोमीटरचा प्रवास पूर्ण केला. यंदाचे वर्ष सायकल वारीच्या दहाव्या पर्वाचे असल्याने सहभागींचा उत्साह विशेष पाहायला मिळाला. मागील सर्व वर्षांतील विक्रम मोडत यंदा देशभरातून आलेल्या सायकलप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

पीसीएमसीचे बापूसाहेब गायकवाड, एमआयडीसीचे अधिकारी प्रकाश शेटबाळे, उद्योजक अन्नारे बिरादार, तात्यासाहेब शेवाळे, बैद्यनाथ हॉस्पिटल संभाजीनगरचे डॉ. संदीप सानप व अनिल सानप तसेच महाराष्ट्र राज्याचे शिक्षण संचालक श्रीराम पानझाडे यांच्यासह आय ए एस चे गजानन खैरे, अजित पाटील, गणेश भुजबळ व इतर अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

इंडो अथलेटिक्स सोसायटीचे वारी प्रमुख गिरीराज उमरीकर यांनी सांगितले की, “वारीचे हे दहावे वर्ष असून दरवर्षीप्रमाणे यंदाही सर्व सहभागी सायकलस्वारांनी एका दिवसात देहू ते पंढरपूर हा प्रवास पूर्ण केला. विशेष म्हणजे यंदा सुमारे ३०० महिला आणि १०० हून अधिक बालसायकलस्वारांनी सहभाग घेतला. महाराष्ट्राबाहेरील राज्यांतूनही मोठ्या प्रमाणावर सायकलस्वार या उपक्रमात सहभागी झाले.”

इंदापूर येथे नगरपालिकेतर्फे नगराध्यक्ष भरतभाई शहा, टेंभुर्णी येथे शिवसेनेचे ज्येष्ठ नेते संजय बाबा कोकाटे त्याचप्रमाणे विविध सायकलिंग गट, सामाजिक संस्था, स्थानिक संघटना आणि असंख्य स्वयंसेवकांचे सहकार्य लाभल्याने हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला. सायकलिंग, आरोग्य, पर्यावरण संवर्धन आणि वारकरी परंपरेचा संगम घडवून आणणाऱ्या या सायकल वारीने समाजात एक सकारात्मक संदेश दिला आहे.


भारतात सायकल वारीची परंपरा रुजविण्याच्या उद्देशाने इंडो अथलेटिक्स सोसायटीने २०१६ मध्ये अवघ्या ७ जणांसह या उपक्रमाची सुरुवात केली. त्यानंतर २०१७ मध्ये २४, २०१८ मध्ये १६०, २०१९ मध्ये सुमारे ५०० सहभागी झाले. कोविड काळातही हा उपक्रम खंडित झाला नाही. २०२१ मध्ये १७५ जणांनी पुणे–पंढरपूर अंतर पूर्ण केले. त्यानंतर २०२२ मध्ये १२००, २०२३ मध्ये १५००, २०२४ मध्ये १७५०, २०२५ मध्ये १९५० आणि यंदा २३५० हून अधिक सायकलस्वार सहभागी झाले. त्यामुळे भारतातील सर्वात मोठी सायकल वारी म्हणून या उपक्रमाने नवा इतिहास रचल्याची माहिती संस्थापक सदस्य गजानन खैरे यांनी दिली. तसेच प्रमुख सदस्य अजित पाटील व गणेश भुजबळ यांनी वारी मार्ग आणि नियोजनाविषयी सविस्तर माहिती दिली. या भव्य उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गिरीराज उमरीकर, अविनाश चौगुले, अमित पवार, अनुप कोहले, अजित गोरे, अविनाश अनुसे, अभिजीत सरोदे, अजय चौरसिया, दीपक गुरुकुल देविदास खुर्द कपिल पाटील मारुती विधाते, मंदार शेंडे, नितीन पवार, प्रदीप जी टाके, प्रमोद चिंचवडे, प्रणय कडू, प्रतीक पवार, प्रशांत तायडे, पवन आहेर, प्रशांत जाधव रमेश माने राहुल राणे, संतोष नखाते, सुनील चाकू, सुशील मोरे, श्रीकांत चौधरी, तुषार माने, विवेक कडू, योगेश तावरे, सुधाकर टिळेकर, शैलेश पाटील, अमृता पाटील, मनोज काशीद, नारायण मगडूत, मदन शिंदे, हेमंत दांगट पाटील यांच्यासह अनेक स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### धोकादायक वीजखांबामुळे अपघाताचा धोका; नागरिक आक्रमक

नारायणगाव (दैनिक संध्या) : पिंपळगाव जोगा कालव्याच्या भराव्यात महावितरण कंपनीने बेकायदेशीर आणि नियमबाह्य पद्धतीने वीजखांब उभारले आहेत. हे धोकादायक खांब तात्काळ हटवण्यात यावेत, अन्यथा शेतकरी स्वतःहून हे खांब उपसून टाकतील, असा आक्रमक इशारा परिसरातील शेतकऱ्यांनी दिला आहे. आणे येथील ३३ केव्ही उपकेंद्रासाठी आळे ते आणे मार्गावरील वीजपुरवठा योजनेसाठी महावितरणच्या ठेकेदाराकडून सुमारे ८ ते ९ वर्षांपूर्वी हे खांब उभारण्यात आले होते. मात्र, हे खांब पिंपळगाव जोगा कालव्याच्या भरावात अत्यंत धोकादायक आणि नियमबाह्य पद्धतीने उभारल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. यापूर्वी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी आणि संबंधित अभियंत्यांनी घटनास्थळी भेट देऊन हे काम तात्काळ बंद करण्याचे आदेश दिले होते, तरीही हे खांब अद्याप तिथून हटवण्यात आलेले नाहीत. सध्या या भागातील अनेक वीजखांब वाकलेल्या अवस्थेत असून, त्यांना जोडणाऱ्या तारा देखील सैल झाल्या आहेत. सध्या जरी ही वीजवाहिनी बंद असली, तरी तिच्या शेजारीच दुसरी एक मुख्य विद्युत वाहिनी सुरू असल्याने धोक्याची पातळी अधिक वाढली आहे. पावसाळ्यात हे खांब कोसळल्यास मोठी जीवितहानी किंवा दुर्घटना घडू शकते, अशी भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. त्यामुळे कालव्याच्या सुरक्षिततेसाठी आणि नागरिकांच्या रक्षणासाठी हे धोकादायक खांब तातडीने हटवावेत, अशी तीव्र मागणी आता जोर धरत आहे.





### 'ईठा' चित्रपटाचे नाव बदलण्याची मागणी

नारायणगाव (दैनिक संध्या) : लावणीसम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर यांच्या जीवनावर आधारित चित्रपटाच्या 'ईठा' या नावाला राष्ट्रवादी चित्रपट व सांस्कृतिक विभागाने आक्षेप घेतला आहे. विठाबाई यांच्या नावाचा आणि त्यांच्या कलेचा योग्य सन्मान राखण्यासाठी चित्रपटाचे नाव 'विठाबाई' किंवा 'विठा' असे करण्यात यावे, अशी मागणी चित्रपट व सांस्कृतिक विभागाचे प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब पाटील यांनी केली. या संदर्भात चित्रपटाचे निर्माते दिनेश व्हिजन, लेखक-दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर, तसेच मॅडॉक फिल्म प्रॉडक्शन यांनी या मागणीचा सकारात्मक विचार करून योग्य निर्णय घ्यावा, असे आवाहन निवेदनाद्वारे करण्यात आले. पाटील म्हणाले, "महाराष्ट्राच्या लोककलेचा अभिमान असलेल्या लावणी आणि तमाशा परंपरेला जागतिक ओळख मिळवून देणाऱ्या राष्ट्रपती पुरस्कारविजेत्या लावणीसम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर यांच्या जीवनावर आधारित चित्रपट निर्मिती होत आहे, ही बाब महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रासाठी अत्यंत अभिमानाची आहे. मात्र, या चित्रपटाचे नाव 'ईठा' असे ठेवण्यात आले आहे. या नावाबाबत आम्ही आक्षेप नोंदवला आहे. ज्या महान कलाकाराच्या संघर्षमय जीवनावर हा चित्रपट आधारित आहे, त्या कलाकाराचे नाव विठाबाई नारायणगावकर आहे. त्यामुळे विठाबाई यांच्या नावाचा आणि त्यांच्या कलेचा योग्य सन्मान राखण्यासाठी चित्रपटाचे नाव 'विठाबाई' किंवा 'विठा' असे करण्यात यावे." विठाबाई नारायणगावकर यांनी आपल्या कलेच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या लोकपरंपरेला नवी ओळख दिली. त्यांच्या योगदानाचा गौरव करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. चित्रपटाच्या नावातूनच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सन्मान आणि इतिहासाची ओळख पुढे जाणे गरजेचे आहे,' असे पाटील यांनी सांगितले.

### जुन्नर नगरपरिषदेच्या कंत्राटी कामगारांचा बेमुदत उपोषणाचा इशारा

नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर नगरपरिषदेमध्ये मागील अनेक वर्षांपासून प्रामाणिकपणे सेवा बजावणाऱ्या कुशल आणि अकुशल कंत्राटी कर्मचाऱ्यांनी बेमुदत उपोषणाचा निर्णय घेतला आहे. गेल्या ९ ते १० महिन्यांपासून मासिक वेतन, तसेच भविष्यनिर्वाह निधी (पीएफ) आणि इतर भत्ते न मिळाल्यामुळे या कर्मचाऱ्यांना प्रचंड आर्थिक संकटाना सामोरे जावे लागत आहे. या प्रलंबित वेतनाचा प्रश्न तातडीने सोडवण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांनी १ जुलैपासून बेमुदत उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. या संदर्भात कर्मचाऱ्यांच्या वतीने जुन्नरच्या मुख्यधिकाऱ्यांना लेखी निवेदन देण्यात आले आहे. हे निवेदन नेहा तांबोळी, सुरज रेंगडे,आरती राजेंद्र कर्पे, स्नेहल तांबोळी, पुनम शिंदे,शिवानी शिंदे,गायत्री घोडे,राहुल जाधव यांच्यासह अनेक कर्मचाऱ्यांच्या वतीने देण्यात आले आहे. प्रशासनाला यापूर्वीही अनेकवेळा लेखी अर्ज करून विनंती करण्यात आली होती, परंतु त्यावर कोणतीही ठोस कारवाई झाली नाही.दीर्घकाळापासून पगार न मिळाल्याने कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांसमोर उदरनिर्वाहाचा मोठा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, त्यांना दैनंदिन गरजा भागवणेही कठीण झाले आहे. प्रशासनाच्या या उदासीन धोरणाचा निषेध म्हणून अखेर सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांनी नगरपरिषद कार्यालयासमोर बेमुदत उपोषणाला बसण्याचा अंतिम निर्णय घेतला आहे.

### आरोग्य शिबिर व सह्याद्री हॉस्पिटल कराड यांच्यावतीने वंध्यत्व तपासणी शिबिर



ओगलेवाडी (दैनिक संध्या) : सदाशिवगड प्राथमिक आरोग्य केंद्रात तालुका आरोग्य विभाग व गांधी फाउंडेशन यांच्या वतीने एचपीव्ही लसीकरण मोहीम, 'माझं गाव आरोग्य संपन्न गाव' आरोग्य शिबिर व सह्याद्री हॉस्पिटल यांच्या वतीने वंध्यत्व तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी भाजपच्या जिल्हा महिला अध्यक्षा तेजस्विनी घोरपडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. नरेंद्र माळी, डॉ. संजय कुंभार, डॉ. शीतल राजमाने, आरोग्य समिती सदस्य राजू सूर्यवंशी, ग्रामपंचायतीच्या प्रशासक निर्मला जिरगे, सदस्य कल्याण डुबल, अवधूत डुबल, धनाजी माने, ग्रामसेवक अनिल जाधव, समन्वयक तुकाराम नलावडे, संजय पिसाळ, के. के. काळे, जयश्री पवार यांची उपस्थिती होती. वाघेरी उपकेंद्राने लसीकरणाचे काम शंभर टक्के पूर्ण केल्याबद्दल डॉ. शरयू पुजारी, माधुरी सोनटक्के व आशांचा घोरपडे यांनी सत्कार केला, तसेच डॉ. दिग्विजय काळे, ॲड. ऋषिकेश जाधव, मारुती जाधव, गौरव वाईकर यांचाही सत्कार केला. डॉ. संजय कुंभार व डॉ. शीतल राजमाने यांनी स्वागत केले. बलवीर राजगडकर यांनी प्रास्ताविक केले. राजू सूर्यवंशी यांनी आभार मानले.

# मनरेगा योजनेतील कथित हलगर्जीपणामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत

## मनरेगाची विहीर पूर्ण; मस्टर न भरल्याने शेतकरी आर्थिक संकटात



**जेजुरी (दै. संध्या)**

पुरंदर तालुक्यातील जवळार्जुन येथील शेतकरी सुरेश रामचंद्र टेकवडे यांनी मनरेगा योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या वैयक्तिक सिंचन विहिरीचे काम पूर्ण करूनही मंजूर निधी न मिळाल्याचा गंभीर आरोप केला आहे. यामुळे ते सध्या आर्थिक अडचणीत सापडले असून संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गट क्रमांक २९४ मधील वैयक्तिक सिंचन विहिरीसाठी ३० मे २०२५ रोजी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देण्यात आली होती. या कामासाठी एकूण ४ लाख ९९ हजार ९६४ रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. तसेच विहिरीच्या कामासाठी कार्यारंभ आदेश (वर्क ऑर्डर) देखील देण्यात आला होता.

शेतकरी सुरेश टेकवडे यांच्या म्हणण्यानुसार, संबंधित अधिकाऱ्यांनी जागेची पाहणी करून काम सुरू करण्यास सांगितले. तसेच मस्टर भरणे व इतर प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी खर्च येईल, आम्ही सर्व काम करून देऊ, असे आश्वासन देण्यात आले होते. त्यानुसार टेकवडे यांनी स्वतःच्या खर्चातून आणि कर्ज काढून विहिरीचे काम पूर्ण केले.

मात्र काम पूर्ण झाल्यानंतरही मंजूर निधी मिळालेला नाही. मनरेगा योजनेअंतर्गत आवश्यक असलेले मस्टर आजपर्यंत भरले गेले नसल्याचा आरोप शेतकऱ्याने केला आहे. त्यामुळे निधी अडकल्याने त्यांच्यावर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे.

विहिरीच्या कामासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड करणे कठीण झाले असून कुटुंबावर आर्थिक ताण वाढला आहे. मंजूर निधी मिळवण्यासाठी टेकवडे यांनी पंचायत समिती कार्यालयाचे अनेकदा हेलपाटे मारले, मात्र अद्याप त्यांच्या प्रश्नाचे समाधानकारक निराकरण झाले नसल्याचा आरोप करण्यात येत आहे.

या प्रकरणामुळे मनरेगा योजनेच्या अंमलबजावणीबाबत प्रश्न उपस्थित होत असून संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेची चौकशी करण्याची मागणी होत आहे. तसेच मंजूर निधी तात्काळ अदा करून शेतकऱ्याला न्याय द्यावा, अशी मागणी ग्रामस्थ व शेतकरी संघटनांकडून करण्यात येत आहे.

दरम्यान, मस्टर का भरले गेले नाही आणि मंजूर निधी का अडकला आहे याबाबत संबंधित प्रशासनाकडून अद्याप कोणतेही अधिकृत स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही.

## वाहतूक अधिकारी शिवाजी नऱ्हे यांची पोलिस उपनिरीक्षक पदावर निवड



**राजगुरुनगर (दै. संध्या)**

वाहतूक शाखेत कार्यरत असलेले सहाय्यक पोलिस फौजदार शिवाजी लक्ष्मण नऱ्हे यांची पोलिस उपनिरीक्षक (PSI) पदावर पदोन्नती झाली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल पोलिस विभागासह विविध क्षेत्रांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. कर्तव्यदक्ष आणि शिस्तप्रिय अधिकारी म्हणून ओळख असलेले शिवाजी नऱ्हे हे सर्वसामान्य नागरिकांमध्ये ही लोकप्रिय राहिले आहे.१९९५ च्या बॅच मध्ये महाराष्ट्र पोलिस दलात रुजू होऊन त्यांनी ठाणे, राजगुरुनगर, चाकण तसेच जिल्हा वाहतूक शाखेत वाहतूक पोलिस म्हणून उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. सध्या ते महाराष्ट्र सुरक्षा पथकांतर्गत महामार्ग पोलिस विभाग, आळेफाटा येथे कार्यरत आहेत. शिवाजी नऱ्हे यांनी आपल्या सेवाकाळात वाहतूक नियोजन, अपघात प्रतिबंधक उपाययोजना तसेच नागरिकांमध्ये वाहतूक नियमांविषयी जनजागृती करण्यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत. कर्तव्यनिष्ठा, प्रामाणिकपणा आणि उत्कृष्ट कार्यशैलीमुळे त्यांनी वरिष्ठ अधिकारी तसेच नागरिकांचा विश्वास संपादन केला आहे.

## सक्तीने स्मार्ट मीटर बसवणाऱ्यांवर कारवाईची मागणी

**नारायणगाव (दै. संध्या)**



महाराष्ट्र राज्यात महावितरणच्या वतीने स्मार्ट वीज मीटर बसविण्याचे काम सुरू आहे. मात्र, नारायणगाव परिसरात अनेक ठिकाणी नागरिकांच्या तक्रारी प्राप्त होत आहेत की, महावितरणचे अधिकारी, कर्मचारी व त्यांच्या नियुक्त एजन्सीचे कर्मचारी नागरिकांना पूर्वसूचना न देता, त्यांना विश्वासात न घेता तसेच अनेक वेळा खोटी माहिती देऊन व दबाव टाकून विद्यमान वीज मीटर काढून स्मार्ट मीटर बसवित आहेत. अशी तक्रार महाराष्ट्र राज्य राजे ग्रुप चे अध्यक्ष जुबेर शेख ,सचिव विजय घेगडे व सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थांनी केली आहे. सदर प्रकारामुळे नागरिकांमध्ये भीती, संभ्रम व तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. ग्राहकांची संमती न घेता किंवा त्यांना योग्य माहिती न देता अशा प्रकारे मीटर बदलणे हे नागरिकांच्या अधिकारांचे उल्लंघन करणारे असून सार्वजनिक शांतता व कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे.

**त्यामुळे त्यांच्या पुढील मागण्या आहेत :**

१) नारायणगाव परिसरात नागरिकांच्या संमतीशिवाय, पूर्वसूचना न देता किंवा खोटी माहिती देऊन स्मार्ट मीटर बसविण्यात आलेल्या सर्व प्रकरणांची सखोल चौकशी करण्यात यावी.
२) नागरिकांची फसवणूक, दिशाभूल किंवा जबरदस्ती केल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधित अधिकारी, कर्मचारी व एजन्सीच्या प्रतिनिधींवर योग्य त्या कायदेशीर तरतुदींनुसार गुन्हे दाखल करण्यात यावेत.
३) नागरिकांना धमकावणे, दबाव टाकणे किंवा चुकीची माहिती देऊन मीटर बदलण्याच्या प्रकारांना तात्काळ आळा घालण्यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात याव्यात.
४) भविष्यात कोणत्याही नागरिकाचा वीज मीटर बदलण्यापूर्वी संबंधित ग्राहकाला लेखी सूचना देऊन त्याची संमती व सहभाग सुनिश्चित करण्यात यावा.
५) ज्यांचे मिटर न विचारता काढून नेले आहेत त्यांना ते पुन्हा बसवून देण्यात यावेत.
६) या प्रक्रियेत पारदर्शकपणा येईपर्यंत स्मार्ट मीटर बदलाची मोहीम तात्काळ थांबवण्यात यावी.

सोबत नागरिकांच्या लेखी तक्रारी जोडलेल्या आहेत.

लोकशाही मार्गाने हे निवेदन सादर केले आहे. तथापि, या निवेदनाबाबत आठ (८) दिवसांच्या आत समाधानकारक लेखी उत्तर व योग्य कारवाई न झाल्यास राजे ग्रुप महाराष्ट्र राज्य, ग्रामस्थ व नागरिकांच्या वतीने मोर्चा काढून तीव्र लोकशाही आंदोलन करण्यात येईल. आंदोलनातून उद्भवणाऱ्या कोणत्याही परिस्थितीची सर्वस्वी जबाबदारी संबंधित अधिकारी व प्रशासनाची राहील. पोलिसांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन तात्काळ योग्य ती कारवाई करावी.अशा मागणीचे निवेदन पोलीस अधीक्षक पुणे व इतर अधिकाऱ्यांना दिले आहे.

## यशस्वी जीवनासाठी ताण-तणावाचे व्यवस्थापन आवश्यक : प्रिया लंघे

**शिरूर (दै. संध्या)**



बदलत्या जीवनशैलीमुळे आणि वाढत्या स्पर्धेमुळे ताण-तणावाचे प्रमाण वाढत असून यशस्वी, समाधानी आणि आनंदी जीवनासाठी ताण-तणावाचे योग्य व्यवस्थापन करणे अत्यंत आवश्यक असल्याचे प्रतिपादन समुपदेशक प्रिया लंघे यांनी केले.

येथील सनशाईन सॅटर्डे क्लबच्या वतीने आयोजित 'ताण-तणाव व्यवस्थापन' या विषयावरील व्याख्यानात त्या बोलत होत्या. कार्यक्रमास महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे माजी अध्यक्ष तथा सनशाईन क्लबचे अध्यक्ष किशोरराजे निंबाळकर, प्राचार्य डॉ. अमोल शहा यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

प्रिया लंघे म्हणाल्या की, आजच्या धावपळीच्या जीवनात पालकांना मुलांच्या भवितव्याची चिंता, सामाजिक बदल, आर्थिक अडचणी, वाढत्या अपेक्षा आणि स्पर्धात्मक वातावरणामुळे मानसिक तणावाचा सामना करावा लागत आहे. जीवनात बदल अटळ आहेत; मात्र त्या बदलांना सकारात्मक दृष्टीकोनातून स्वीकारून परिस्थितीनुसार स्वतःमध्ये बदल करणे आवश्यक आहे.

त्या पुढे म्हणाल्या की, आपल्या भावना आणि विचार व्यक्त करण्याची सवय लावल्यास मनावरील ताण कमी होण्यास मदत होते. तणाव निर्माण करणाऱ्या घटकांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करावा. आनंद ही बाह्य गोष्ट नसून एक अंतर्मनातील अनुभूती आहे. त्यामुळे आपल्या आयुष्यात काय नाही याचा विचार करण्याऐवजी आपल्याकडे काय आहे याकडे सकारात्मक नजरेने पाहणे गरजेचे आहे.

'मी स्वतःवर प्रेम करतो' ही भावना मनात रुजवणे आवश्यक असून स्वतःच्या चांगल्या-वाईट कृतींची जबाबदारी स्वीकारावी. चूक झाल्यास मनापासून 'सॉरी' म्हणणे आणि मदत मिळाल्यास 'धन्यवाद' व्यक्त करण्याची सवय जोपासल्यास नातेसंबंध अधिक मजबूत होतात, असेही त्यांनी सांगितले. या कार्यक्रमात सनदी लेखापाल (सीए) अंतिम परीक्षेत यश मिळवलेल्या विधी विनोद बोथरा यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक किशोरराजे निंबाळकर यांनी केले. प्राचार्य डॉ. अमोल शहा यांनी प्रिया लंघे यांचा परिचय करून दिला. सूत्रसंचालन प्रा. सतीश धुमाळ यांनी केले, तर आभार पल्लवी शहा यांनी मानले.

## शेतकऱ्यांनी रोखला महामार्ग

**अंबाजोगाई (दै. संध्या)**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेतील जाचक अटी रद्द करून सरसकट कर्जमाफी द्यावी, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना घोषित केल्याप्रमाणे पीकविमा भरपाई मिळावी आणि रासायनिक खतांचा पुरवठा सुरळीत करावा, या प्रमुख मागण्यांसाठी तालुक्यातील शेतकऱ्यांनी मंगळवारी (ता. २३) बर्दापूर फाट्यावर अंबाजोगाई-लातूर महामार्गावर रास्ता रोको आंदोलन केले. या आंदोलनामुळे काही काळ वाहतूक विस्कळित झाली. बीड जिल्ह्यात गत खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर पिकांचे नुकसान झाले. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मुख्यमंत्र्यांनी जाहीर केल्याप्रमाणे प्रतिहेक्टर १७,५०० रुपयांची विमा भरपाई द्यावी, तसेच खतांच्या वाढीव किमती कमी करून पुरवठा नियमित करावा, या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आंदोलन करण्यात आले. शेतकरी नेते अविनाश मोरे, ॲड. अजय बुरांडे, विलास बापू मोरे, सुरेश घोडके, धनाजी मदने, गोविंद मोरे, भागवतराव निकम, श्रीहरी होळकर, संजय गिराम, निलेश धुमाळ, तानाजी धुमाळ, विलास धुमाळ, उसामराव जांभळे, गोविंद चव्हाण, अमोल चव्हाण, नितीन शिंदे, वसंत शिंदे, विलास देशमुख, सादेक हुसेन, विभीषण औताडे, बबन भगत, मंचकराव जाधव, राजेभाऊ चव्हाण, नाना यादव, हनुमंत धुमाळ, वैभव काळम आदींच्या नेतृत्वाखाली शेकडो शेतकरी भर उन्हात रस्त्यावर ठाण मांडून बसले होते.

## सासवडच्या शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा



**सासवड (दै. संध्या)**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, सासवड येथे 'आंतरराष्ट्रीय योग दिन' मोठ्या उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे शाळेच्या परिसरात आरोग्य आणि सकारात्मकतेचे वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक स्थैर्य आणि निरोगी जीवनशैलीबाबत जागरूकता निर्माण करणे हे होते. कार्यक्रमास संस्थेचे सहसचिव डी. एन. गवळी आणि प्राचार्या रेणुका सिंह मर्चंट प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मान्यवरांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना नियमित योगाभ्यासाचे महत्त्व पटवून देत, सुदृढ आयुष्यासाठी योग जीवनाचा अविभाज्य भाग बनवण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमात विद्या देवकर यांनी विद्यार्थ्यांना योगासने आणि प्राणायामाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण दिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी ताडासन, वृक्षासन, भुजंगासन, वज्रासन यांसह विविध श्वसनक्रियांचा सराव केला. शिस्तबद्ध पद्धतीने आणि उत्साहाने पार पडलेल्या या प्रात्यक्षिकांमुळे उपस्थितांमध्ये चैतन्याचे वातावरण होते. डॉ. अभिजित टकले यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की, "नियमित योगाभ्यासामुळे केवळ शारीरिक आरोग्यच सुधारत नाही, तर मानसिक एकाग्रता, आत्मविश्वास आणि सकारात्मक दृष्टिकोन विकसित होण्यास मोठी मदत होते."

## मराठा समाजाच्या संघटनात्मक बळकटीसाठी बैठका काळाची गरज : राजेंद्र कोंढरे

**शिरूर (दै. संध्या)**



मराठा समाजाची संघटनात्मक ताकद अधिक सक्षम करण्यासाठी विभागवार बैठका, सातत्यपूर्ण संवाद आणि नियोजनबद्ध कार्यपद्धती आवश्यक असून समाजासमोरील विविध सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक आव्हानांवर मात करण्यासाठी एकजूट हाच प्रभावी मार्ग असल्याचे प्रतिपादन अखिल भारतीय मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र कोंढरे यांनी केले.

शिरूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज बाजार समिती येथे आयोजित मराठा समाज संवाद बैठकीत ते मार्गदर्शन करत होते. सकल मराठा समाज, दक्षिण पुणे, अखिल भारतीय मराठा महासंघ तसेच समविचारी संस्था व संघटनांच्या संयुक्त विद्यमाने या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी बोलताना कोंढरे यांनी मराठा समाजाच्या संघटनात्मक बांधणीसाठी विभागनिहाय बैठका घेण्याची आवश्यकता अधोरेखित केली. वाढत्या पुणे महानगराच्या पार्श्वभूमीवर समाजासमोरील बदलती सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन युवक आणि विद्यार्थ्यांसाठी सक्षम दिशा देणारे उपक्रम राबविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

तसेच विविध क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन समाजापर्यंत पोहोचवून नव्या पिढीला सक्षम, सुशिक्षित व संघटित करण्यासाठी सर्व स्तरावर प्रयत्न होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.


या बैठकीस अखिल भारतीय मराठा महासंघाच्या राष्ट्रीय सरचिटणीस शोभना पांचगे, पुणे जिल्हाध्यक्ष अंकुश लांडे, सरचिटणीस भास्कर पुंडे जिल्हा उपाध्यक्ष गणेश शिंदे, वर्षा काळे, शिरूर तालुका अध्यक्ष श्यामकांत वर्पे, महिला तालुका अध्यक्ष अर्चना डफळ, युवती अध्यक्षा मणिषा तरटे, युवक अध्यक्ष राहुल शिंदे, संभाजी बिग्रेडचे सुदाम कोलते, माजी अध्यक्ष संभाजी कर्डिले, राणी कर्डिले, साधना शितोळे, उर्मिला फलके, सुधीर तांबे, रुपेश घाडगे बबडी साळुंके यांच्यासह मराठा समाजातील अनेक बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्यामकांत वर्पे यांनी केले तर आभार प्रदर्शन नगरसेवक उमेश शेळके यांनी मानले.

बैठकीत उपस्थित समाजबांधवांनी विविध विषयांवर आपली मते मांडत समाजहिताच्या प्रश्नांवर सातत्याने संवाद व संघटनात्मक बळकटीसाठी अशा बैठका नियमित आयोजित करण्याची गरज व्यक्त केली.




दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



## थोडक्यात पण महत्वाचे



### विद्यार्थ्यांनी घेतली राज्यपालांची भेट

मुंबई (दैनिक संध्या) : पूंछ या जम्मूच्या सीमावर्ती भागातील युवक युवतींच्या एका शिष्टमंडळाने महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची महाराष्ट्र लोकभवन येथे सदिच्छा भेट घेतली. भारतीय सैन्यदलाच्या सद्भावना मोहिमेंतर्गत या भेटीचे आयोजन करण्यात आले होते. राज्यपालांनी सर्व विद्यार्थ्यांची आपुलकीने चौकशी केली व त्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. पाचपैकी तीन युवती राष्ट्रीय स्तरावरील हॉकी खेळाडू असून एका विद्यार्थिनीला भारतीय प्रशासकीय सेवेत जायचे असल्याचे तिने सांगितले. यावेळी मौलवी फरीद मलिक, शबनम परवीन, नवाझ मेहमूद, उमर अब्दुल्ला खान, मुबशीर अहमद, शाहिस्ता मजीद, आदिल मजीद, शबीना परवीन व नसीम फातिमा हे उपस्थित होते.

### शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रिया सुरू

मुंबई (दैनिक संध्या) : आदिवासी विकास विभाग, अपर आयुक्त, ठाणे विभागाअंतर्गत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प मुंबई, उपनगरात आदिवासी मुलांचे एक व आदिवासी मुलींचे एक अशी दोन शासकीय वसतिगृह कार्यरत आहेत. या वसतिगृहात अनुसुचित जमातीच्या प्रवर्गातील रिक्त असलेल्या जागांवर २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षाकरिता प्रवेश देण्यासाठी स्वयंम पोर्टल सुरू करण्यात आले असून वसतिगृहांमध्ये प्रवेशासाठी पात्र विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन प्रकल्प अधिकारी, मुंबई यांनी केले आहे. २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षाकरिता मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील मुला-मुलींच्या कनिष्ठ महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालय तसेच व्यावसायिक, बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम, बी.ए, बी कॉम, बी.एस.सी, पदवीका, पदवी आणि पदवीनंतरचे पदव्युत्तर पदवी, पदविका इत्यादी अभ्यासक्रमातील प्रवेशित विद्यार्थ्यांनी वसतिगृह प्रवेशासाठी ऑनलाईन प्रवेश अर्ज https://swayam.mahaonline.gov.in या पोर्टलवर केल्यानंतर रिक्त जागांवर निकषानुसार प्रवेश देण्यात येईल. त्यानुसार मुंबई शहर व मुंबई उपनगरातील, अनुसूचित जमातीच्या मुला/मुलींच्या शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी https://swayam.mahaonline.gov.in पोर्टल लिंकचा वापर करून अर्ज भरावे, काही अडचणी उद्भवल्यास स्थानिक गृहपाल अथवा प्रकल्प कार्यालयाशी संपर्क साधून प्रवेश अर्ज भरावेत असे प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे.

### निवासी शाळेत प्रवेशासाठी करा ६ जुलैपर्यंत अर्ज

मुंबई (दैनिक संध्या) : २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांनी नामांकित इंग्रजी माध्यमांच्या शाळेमध्ये प्रवेशासाठी ६ जुलै २०२६ पर्यंत अर्ज करावेत, असे आवाहन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी मुंबई यांनी केले आहे. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शहरातील नामांकित इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळेत प्रवेश देण्यात येतो. या योजनेसाठी २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १ ली व इयत्ता २ री मध्ये प्रवेश घेण्यासाठी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, मुंबई यांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या गावे व पाडे येथील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह ६ जुलै २०२६ पर्यंत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी, मुंबई या कार्यालयास अर्ज करणे आवश्यक असल्याचे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी यांनी कळविले आहे.

### भक्ती, संस्कृती आणि परंपरेचा अद्वितीय संगम

मुंबई (दैनिक संध्या) : महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने 'सोमनाथ स्वाभिमान पर्व' निमित्त सोमवार, 6 जुलै 2026 रोजी सकाळी 10 वाजता त्र्यंबकेश्वर मंदिर, नाशिक येथे विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. भारतीय संस्कृतीतील श्रद्धा, अध्यात्म आणि सनातन परंपरेचे महत्त्व जनमानसापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

## तंत्रज्ञानाधिष्ठित आणि लोकाभिमुख वन प्रशासनासाठी काम करा – वन मंत्री

■ मुंबई (दै. संध्या)



राज्यातील वन प्रशासन अधिक सक्षम, पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधिष्ठित करण्यासाठी वन विभागाने प्राधान्याने कार्यवाही करावी, तसेच वनजमिनींचे संरक्षण, मानव-वन्यजीव संघर्ष कमी करणे आणि ३०० कोटी वृक्षलागवड अभियानाची प्रभावी अंमलबजावणी यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश वन मंत्री गणेश नाईक यांनी दिले.

वन विभागाच्या विविध योजनांचा आणि प्राधान्याच्या विषयांचा आढावा सह्याद्री अतिथीगृह येथे बैठकीत घेण्यात आला. यावेळी वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) एम.श्रीनिवास राव, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) एम.एस.रेड्डी, प्रधान मुख्य वनसंरक्षक (सामाजिक वनीकरण) विवेक खांडेकर, उपसचिव निकीता पांडे तसेच विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. वन मंत्री गणेश नाईक म्हणाले,"वाटचाल वन विभागाची" या पुस्तकातील महत्त्वपूर्ण मुद्द्यांच्या अनुषंगाने तातडीने कार्यवाही करण्यासाठी स्वतंत्र ऑनलाइन प्रणाली विकसित करण्यात यावी. यामुळे विविध उपक्रमांच्या प्रगतीवर सातत्याने लक्ष ठेवणे आणि वेळेत अंमलबजावणी करणे शक्य होणार आहे.

वन प्रशासन अधिक आधुनिक आणि परिणामकारक करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता, भू-स्थानिक माहिती प्रणाली ई-ऑफिस आणि इतर डिजिटल साधनांचा व्यापक वापर वाढविण्यावर भर देण्यात यावा. डिजिटल गव्हर्नन्सच्या माध्यमातून निर्णय प्रक्रियेत गती, पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढविण्याचे उद्दिष्ट असल्याचे वन मंत्री नाईक यांनी सांगितले. वनजमिनींच्या संरक्षणाच्या दृष्टीने महसूल विभाग आणि वन विभागाच्या नोंदींमधील तफावत दूर करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात यावीत. तसेच महसूल विभागाच्या धर्तीवर वनजमिनींचे डिजिटल भुअभिलेख तयार करण्याची प्रक्रिया गतीमान करण्यात यावी. पीएम गती शक्ती पोर्टलवरील माहिती अद्ययावत ठेवावी असे निर्देश वन मंत्री गणेश नाईक यांनी दिले.

मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी नियंत्रण कक्ष, ट्रान्झिट ट्रीटमेंट सेंटर, रॅपिड रेस्क्यू टीम, प्राथमिक प्रतिसाद पथके, एआय-आधारित अलर्ट प्रणाली आणि माकड निर्बीजकरण केंद्र यांसारख्या उपक्रमांच्या अंमलबजावणीला वेग देण्याचे निर्देश देण्यात आले. यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेबरोबरच वन्यजीव संवर्धनालाही चालना मिळणार आहे, असल्याची माहिती देण्यात आली.

राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी ३०० कोटी वृक्षलागवड अभियानाच्या अनुषंगाने दर्जेदार रोपांची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी नर्सरींचे बळकटीकरण करण्यावर विशेष भर देण्यात आला. टिश्यू कल्चर आधारित रोपनिर्मितीला गती देण्याबरोबरच इतर नर्सरींच्या क्षमतेत वाढ करण्यात यावीत. आगामी वृक्षारोपण मोहिमांचे नियोजन वेळेत पूर्ण करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी. विविध योजनांसाठी आवश्यक निधी मागणी प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देश वन मंत्री नाईक यांनी दिले. अर्थसंकल्पीय तरतुदींचा पूर्ण लाभ घेत विकासकामांना अधिक गती द्यावी असे निर्देश त्यांनी दिले.

वन विकास महामंडळाच्या माध्यमातून ग्रीन बॉण्ड उभारणीची प्रक्रिया वेगाने राबविण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच फर्निचर निर्मिती, मध उत्पादन, वूड पॅलेट आणि अगरबत्ती निर्मिती यांसारख्या मूल्यवर्धित प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेऊन त्यामध्ये आवश्यक सुधारणा करण्याचे असे निर्देश त्यांनी दिले. राज्यातील वनसंपदेचे संरक्षण, पर्यावरण संवर्धन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि लोकसहभाग यांचा समन्वय साधत वन विभागाला अधिक सक्षम बनविण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार वन मंत्री गणेश नाईक यांनी केला.



## ग्रामरोजगार सहाय्यकांच्या प्रश्नांबाबत शासन सकारात्मक

■ महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि रोहयो मंत्री भरत गोगावले यांची माहिती

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील ग्रामरोजगार सहाय्यकांच्या प्रलंबित मागण्यांबाबत शासन सकारात्मक आहे. मुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करून ग्रामरोजगार सहाय्यकांच्या मानधन, सेवा संरक्षण आणि प्रशासकीय अधिकारांसंदर्भातील प्रश्नांबाबतही लवकरच निर्णय घेतला जाईल, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी दिली. ग्रामरोजगार सेवक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत मंत्रालयात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांच्या उपस्थितीत बैठक झाली. बैठकीत ग्रामरोजगार सहाय्यकांच्या मानधन वितरणातील विलंब, सेवा संरक्षण, नियुक्ती व बडतर्फीचे अधिकार, शासकीय ओळखपत्र आणि इतर प्रशासकीय अडचणींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) प्रभावीपणे राबविण्यात ग्रामरोजगार सहाय्यकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. ग्रामपंचायत स्तरावरील कामांची नोंद, मजुरांची माहिती, रोजगार हमी कामांचे नियोजन आणि अंमलबजावणी यांसह अनेक जबाबदाऱ्या ते पार पाडत असतात. त्यामुळे त्यांच्या अडचणी व मागण्यांकडे शासन अत्यंत संवेदनशीलतेने पाहत असल्याचे सांगण्यात आले.

रोजगार हमी विभागाने ग्रामरोजगार सहाय्यकांच्या मानधनासंदर्भातील सद्यस्थितीचा आढावा सादर केला. ग्रामरोजगार सहाय्यकांसाठी निश्चित मानधन, प्रोत्साहन मानधन, प्रवास भत्ता आणि डेटा पॅक भत्त्याची तरतूद असल्याची माहिती देण्यात आली. किमान कामकाजाचे निकषही स्पष्टपणे निश्चित करण्याचे निर्देश देण्यात आले. ग्रामरोजगार सहाय्यकांना शासकीय ओळखपत्र उपलब्ध करून देण्याचा निर्णय तत्त्वतः मान्य करण्यात आला. ग्रामरोजगार सेवक संघटनेचे राज्याध्यक्ष संदीप माने यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी आणि संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी बैठकीस उपस्थित होते.

## बंद हायड्रोप्रोजेक्ट कार्यान्वित करावेत

### जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील

■ मुंबई (दै. संध्या)

■ अहिल्यानगर शहरातील सीना नदीचे पुनर्जीवन कामास गती देण्याचे निर्देश



कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळाच्या कार्यक्षेत्रामध्ये येणाऱ्या जिल्ह्यांमध्ये मुदत संपलेले व बंद हायड्रोप्रोजेक्ट कार्यान्वित करण्यासाठी प्रक्रिया करावी, असे निर्देश जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले. मंत्रालयात कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाची बैठक जलसंपदा मंत्री विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, सचिव संजय बेलसरे, कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत धुमाळ आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. जलसंपदा विभागाव्दारे जलविद्युत प्रकल्पाच्या दुरुस्ती व पुर्नबांधणीबाबत धोरण ठरविण्यात आले आहे. हे प्रकल्प १९६३ ते २००२ या कालावधीमध्ये कार्यान्वित झाले आहेत त्यांचे आयुर्मान २४ वर्षे ते ६३ वर्षे दरम्यान आहे असे जलसंपदा मंत्री विखे पाटील यांनी सांगितले. जिल्ह्यांमध्ये जलविद्युत प्रकल्प संख्या १६ असून स्थापित क्षमता २०७१ MW यासाठी मुदत संपलेले व बंद असलेले हायड्रोप्रोजेक्ट कार्यान्वित करण्यासाठी महामंडळ स्तरावर प्रक्रिया राबविणेत येईल. जलविद्युत प्रकल्पाचे सर्वसाधारण आयुर्मान ३५ वर्षे गृहित धरण्यात येते अशी माहिती देण्यात आली. अहिल्यानगर महानगरपालिका यांच्यामार्फत शहरातील सीना नदीचे खोलीकरण व रुंदीकरणाचे काम सुरू आहे.

## एसटी कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व वेतनवाढीचा लाभ – प्रताप सरनाईक

■ मुंबई (दै. संध्या)



राज्य परिवहन (एसटी) महामंडळातील सुमारे ८६ हजार कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांना न्याय देण्यासाठी शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला असून, राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणेच एसटी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्ता, घरभाडे भत्ता आणि वार्षिक वेतन वाढ करण्यास मंजुरी देण्यात आली आहे, अशी घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज विधानसभा व विधानपरिषद मध्ये केली.

विधानसभेत व विधानपरिषदेत निवेदन करताना मंत्री सरनाईक म्हणाले की, एसटी ही केवळ परिवहन संस्था नसून महाराष्ट्राच्या सर्वसामान्य जनतेची जीवनवाहिनी आहे. गेली आठ दशके 'लालपरी'ने राज्यातील शेतकरी, विद्यार्थी, कामगार, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दुर्गम भागातील नागरिकांना सेवा दिली आहे. या सेवेमागे एसटी कर्मचाऱ्यांचे योगदान मोलाचे असून त्यांच्या न्याय्य मागण्यांबाबत शासनाने सकारात्मक भूमिका घेतली आहे.

या निर्णयानुसार एसटी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ५३ टक्क्यांवरून ५८ टक्के करण्यात आला आहे; तसेच घरभाडे भत्ता ८-१६-२४ टक्क्यांवरून १०-२०-३० टक्के करण्यात आला आहे. वार्षिक वेतनवाढीचा दर २ टक्क्यांवरून ३ टक्के करण्यात आला आहे. यामुळे एसटी महामंडळावर दरमहा सुमारे ४५ कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडणार असला, तरी कर्मचाऱ्यांचे मनोबल वाढविण्यासाठी हा खर्च आवश्यक असल्याचे मंत्री सरनाईक यांनी विधानसभेत सांगितले. तसेच या आगामी काळात महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, वार्षिक वेतनवाढीची थकबाकी आणि इतर वैधानिक देणी मिळून सुमारे ५ हजार ६४९ कोटी रुपये अदा करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचेही त्यांनी सांगितले.

शासनाच्या या निर्णयानंतर एसटी कर्मचाऱ्यांनी २९ जून २०२६ रोजी प्रस्तावित धरणे आंदोलन मागे घेण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती देत, हा शासन आणि कर्मचाऱ्यांमधील परस्पर विश्वासाचा विजय असल्याचे मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

## महाराजस्व अभियानातून सामान्यांच्या आयुष्यात सकारात्मक परिवर्तन – महसूल मंत्री

■ मुंबई (दै. संध्या)



महसूल विभागाच्या माध्यमातून राज्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान राबविण्यात येत आहे. हे अभियान लोकचळवळीच्या स्वरूपात पुढे येऊन यामध्ये जनतेच्या दैनंदिन आयुष्याशी निगडित प्रश्न सुटले पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानातून जनतेच्या आयुष्यात सकारात्मक परिवर्तन नक्कीच घडणार आहे, असा विश्वास महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानभवनातील कामकाज सल्लागार समिती कक्षात आयोजित बैठकीत व्यक्त केला. बैठकीला अभियानाच्या समितीतील विधान परिषद आमदार डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार प्रज्ञा राजीव सातव, आमदार माधवी नाईक, आमदार प्रवीण दरेकर, प्रमोद जठार, श्रीकांत भारतीय, संजय भेंडे, सुनील कर्जतकर, विवेक कोल्हे, हेमंत पाटील, विक्रांत पाटील, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे उपस्थित होते. तसेच दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे आमदार प्रसाद लाड, आमदार मनिषाताई कायंदे, योगेश टिळेकर, सर्व विभागीय आयुक्त, नोंदणी महानिरीक्षक, जमाबंदी आयुक्त यांनी बैठकीत सहभाग घेतला.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, या अभियानांतर्गत १ जानेवारी २०११ पूर्वी असलेल्या अतिक्रमण धारकांना नियमित करण्यात येऊन त्यांना मालकी हक्क वितरीत करण्यात यावे. अभियानांतर्गत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या २२ जुलै रोजी असणाऱ्या वाढदिवसानिमित्त २१, २२ व २३ जुलै २०२६ रोजी विधानसभा मतदारसंघनिहाय शिबिर घेण्यात यावे. संबंधित मतदारसंघातील जनतेची निकड लक्षात घेता शिबिराच्या माध्यमातून अधिकाधिक नागरिकांना लाभ द्यावा. यासाठी विभागीय आयुक्त स्तरावर शिबिराचा विषय लाभार्थ्यांची होणारी संख्या ठिकाण आणि दिनांक याबाबत रूपरेषा ठरविण्यात यावी.

या शिबिरासाठी जमाबंदी आयुक्त व नोंदणी महानिरीक्षक यांच्या स्तरावरून नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात यावी. प्रत्येक विभागीय आयुक्त यांनी जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी व तालुका सरावरील महसूल यंत्रणेसमवेत दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे दररोज बैठक आयोजित करावी. या शिबिरांचे यशस्वी आयोजन करून अधिकाधिक लाभार्थ्यांना लाभ द्यावा. अभियानाचा उद्देश हा संबंधित भागातील नागरिकांचे प्रश्न सोडवून त्यांना महसूल यंत्रणेच्या माध्यमातून विविध लाभ देण्याचा आहे. शिबिरामधील लाभार्थ्यांना विनासायास लाभ मिळवून देण्यासाठी शिबिराच्या यशस्वी आयोजनाकरिता निधीची तरतूद करण्यात यावी, अशा सूचनाही महसूल मंत्री बावनकुळे यांनी दिल्या.

ते पुढे म्हणाले, अभियानांतर्गत राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजना प्रभावीपणे राबवावी. या योजनेअंतर्गत महिला बचत गटांना १ लाख रुपये अर्थ सहाय्य आणि अडीच एकर जमीन देण्यात येते. अभियानाचा भाग समजून या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करून महिला बचत गटांना लाभ द्यावा.

अभियानादरम्यान जिवंत सातबारा करणे, महसूल नोंदी अध्यायावत करणे, महिला शेतकरी कायद्यानंतर महिला शेतकऱ्यांना प्रमाणपत्र वाटप करणे, १ जानेवारी २०११ पूर्वी असलेल्या अतिक्रमणांना २५ मार्च २०२६ च्या शासन निर्णयानुसार नियमित करणे, आदी कामे करावीत. बैठकीत समितीतील सदस्य असलेल्या विधानपरिषद सदस्यांकडून विविध सूचना मांडण्यात आल्या. तसेच विभागीय आयुक्त यांनीही आपल्या सूचना अधोरेखित केल्या.

## मागण्यांबाबत सकारात्मक : डॉ. अशोक वुईके



■ मुंबई (दै. संध्या)

अनुदानित व शासकीय आश्रमशाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत शासन सकारात्मक असून कोणत्याही कर्मचाऱ्यावर अन्याय होऊ दिला जाणार नाही असे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी सांगितले.

आदिवासी विकास मंत्री डॉ. वुईके यांच्या अध्यक्षतेखाली आदिवासी अनुदानित आश्रमशाळा, शासकीय आश्रमशाळा तसेच आदिवासी उपयोजना (टीएसपी) क्षेत्रातील अंशतः अनुदानित उच्च माध्यमिक विद्यालयांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत बैठक झाली. बैठकीस माजी आमदार श्रीकांत देशपांडे, आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे तसेच संबंधित वरिष्ठ अधिकारी, शिक्षक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

आदिवासी विकास मंत्री डॉ. वुईके म्हणाले, शासकीय आणि अनुदानित आश्रमशाळांमधील शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी अध्यापनाचे नियोजन, शिक्षकांची शैक्षणिक पात्रता, निरीक्षण व्यवस्था आणि शैक्षणिक मूल्यमापन अधिक प्रभावी करण्यावर भर देण्यात येणार आहे. आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताला सर्वोच्च प्राधान्य देत आश्रमशाळांशी संबंधित सर्व प्रलंबित प्रश्नांबाबत सकारात्मक भूमिका घेण्यात येईल. रास्त मागण्यांबाबत निर्णय घेण्यात येतील, असे यावेळी त्यांनी स्पष्ट केले. शिक्षण व्यवस्थापन आणि प्रशासन यामध्ये स्पष्ट विभागणी करून गुणवत्तापूर्ण शैक्षणिक व्यवस्थापन उभारण्यावर विभागाचा भर असेल. आश्रमशाळांमधील शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी अध्यापन नियोजन, दैनंदिन अध्यापन नोंदी, शाळा तपासणी आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक मूल्यमापनावर अधिक भर दिला जाणार आहे. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील अंशतः अनुदानित २० उच्च माध्यमिक विद्यालयांमधील वर्ग तुकड्यांना १०० टक्के अनुदान मंजूर करण्या संदर्भात आर्थिक व प्रशासकीय बाबींचा अभ्यास करून निर्णय घेण्यात येईल, असे आदिवासी विकास मंत्री डॉ. वुईके यांनी सांगितले. बैठकीत अनुदानित आश्रमशाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन, पदोन्नती, निवृत्तीवेतन, राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (एनपीएस), रिक्त पदांचे समायोजन तसेच सेवाविषयक लाभांबाबतही चर्चा झाली.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### जयेश कंद सोशल फाउंडेशनकडून लोणीकंद ग्रामपंचायतीला ट्रॅक्टर भेट

कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : सामाजिक बांधिलकी जपत विविध समाजोपयोगी उपक्रम राबविणाऱ्या जयेश कंद सोशल फाउंडेशनच्या वतीने लोणीकंद ग्रामपंचायतीला कचरा संकलन व स्वच्छता व्यवस्थेसाठी नवीन ट्रॅक्टर भेट देण्यात आला. या ट्रॅक्टरचे पूजन लोणीकंद गावातील ज्येष्ठ नागरिकांच्या शुभहस्ते व आशीर्वादाने करण्यात आले. यावेळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना हवेली तालुका राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे अध्यक्ष जयेश कंद म्हणाले, "गावातील ज्येष्ठ नागरिक हे आमचे मार्गदर्शक आहेत. त्यांच्या मार्गदर्शनातूनच समाजसेवेची प्रेरणा मिळते. त्यांच्या आशीर्वादाने आणि ग्रामस्थांच्या सहकार्याने 'स्वच्छ लोणीकंद, सुंदर लोणीकंद' हा संकल्प अधिक प्रभावीपणे राबविण्यास आम्ही कटिबद्ध आहोत." लोणीकंद गावातील स्वच्छता व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने हा ट्रॅक्टर ग्रामपंचायतीला देण्यात आल्याचे फाउंडेशनच्या वतीने सांगण्यात आले. या उपक्रमामुळे गावातील कचरा संकलन व स्वच्छता व्यवस्थेला मोठी मदत होणार असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

### गंभीर गुन्ह्यांतील फरार सराईत गुन्हेगार जेरबंद



पुरंदर (दैनिक संध्या) : पुणे ग्रामीण दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) मोठी कारवाई करत जबरी चोरी, खंडणी,खुनाचा प्रयत्न व आर्म अ‍ॅक्टसह विविध गंभीर गुन्ह्यांमध्ये फरार असलेल्या सराईत गुन्हेगार दिगंबर उर्फ दिग्या दशरथ शेंडकर (वय २८, रा. चांबळी, ता. पुरंदर, जि. पुणे) याला सासवड येथून जेरबंद केले आहे. दिगंबर शेंडकर याच्याविरोधात जेजुरी, सासवड व शिरूर पोलीस ठाण्यात गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. दिनांक ३ ऑक्टोबर २०२५ रोजी बेलसर येथील सुरज अनिल जाधव यांना ट्रान्सफॉर्मर बंद न केल्याच्या कारणावरून लोखंडी रॉड व कोयत्याने मारहाण करून गंभीर जखमी करण्यात आले होते. त्यानंतर आरोपी फरार झाला होता. तसेच, ९ मार्च २०२६ रोजी सोनोरी येथील हॉटेल व्यावसायिक राहुल सुभाष काळे यांच्या हॉटेलवर धाड टाकून मालक व कर्मचाऱ्यांना दमदाटी, शिवीगाळ व मारहाण करत काऊंटरमधील ३२ हजार रुपये जबरदस्तीने लुटण्यात आले होते. यापूर्वीही आरोपीने संबंधित व्यावसायिकाकडून अडीच लाख रुपयांची खंडणी उकळल्याचा आरोप आहे. याशिवाय, १९ मार्च २०२६ रोजी शिरूर तालुक्यातील मांडवगण फराटा येथे क्रिकेट मैदानावरील बॅनरवर फोटो लावण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून आरोपी व त्याच्या साथीदारांनी फिर्यादीवर पिस्तुलातून गोळीबार करून खुनाचा प्रयत्न केला होता. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिगंबर शेंडकर हा रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर राजगड, जेजुरी,सासवड व शिरूर पोलीस ठाण्यांमध्ये खून, खुनाचा प्रयत्न,दरोडा, जबरी चोरी,खंडणी, दुखापत,आर्म अ‍ॅक्ट व मोक्का अंतर्गत एकूण १५ गंभीर गुन्हे दाखल आहेत.

### चाकणला अडथळा ठरणाऱ्या अतिक्रमणावर हातोडा



चाकण (दैनिक संध्या) : चाकण नगरपरिषदेमार्फत चाकण नगरपरिषद हद्दीतील पुणे - नाशिक हायवेवरील रुद्राक्ष हॉटेल ते शनीमंदिर व बाजारपेठ आणि शिवाजी विद्यालयाच्या गजबजलेल्या रस्त्यावर अतिक्रमणावर हातोडा मारण्यात आला. नगरपरिषदेच्या वतीने बेधडक ही कारवाई करण्यात आली. चाकणला मुख्य रस्त्यावर अतिक्रमण करणाऱ्या व्यावसायिक फेरीवाल्यांवर कारवाई करण्यात आली असून, यामध्ये व्यावसायिकांचे हातगाडी व इतर साहित्य जप्त करण्यात आले असल्याची माहिती चाकण नगरपरिषदचे मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव यांनी दिली. चाकण नगरपरिषदेच्या अतिक्रमण विभागामार्फत दैनंदिन अतिक्रमण करणाऱ्या व्यावसायिकांवर धडक कारवाई करण्यात येत असून, शहरातील गजबजलेल्या शिवाजी विद्यालयासमोरील तसेच बाजारपेठेतील गणपती मंदिर परिसरातील अतिक्रमणावर पोलीस प्रशासनाच्या मदतीने चाकण नगरपरिषदेच्या अतिक्रमण विभागातील कर्मचाऱ्यामार्फत ही कारवाई करण्यात आली. चाकण शहरातील अतिक्रमणावर आळा घालण्यासाठी सदर अतिक्रमण निर्मूलनाची धडक कारवाई यापुढेही चालू राहणार असून, व्यावसायिक आस्थापनांनी आपापले अतिक्रमण स्वतःहून काढून घ्यावे, असे आवाहन नगरअभियंता तथा अतिक्रमण विभाग प्रमुख संतोष गायकवाड यांनी केले आहे.

# बीबीएफ तंत्रज्ञान कार्यशाळेला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



राजगुरुनगर (दै. संध्या)

खरीप हंगामात हवामानातील अनिश्चिततेवर मात करून उत्पादनवाढ साध्य करण्यासाठी आणि जमिनीची सुपीकता टिकवून ठेवण्यासाठी आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याची गरज लक्षात घेऊन खेड तालुका कृषी विभागाच्या वतीने सातकर स्थळ येथे बीबीएफ (रुंद वरंबा-सरी) तंत्रज्ञानावरील कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेला तालुक्यातील ट्रॅक्टरधारक व प्रगतशील शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यशाळेत बीबीएफ (Broad Bed Furrow) यंत्राद्वारे पेरणी पद्धतीचे थेट प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. यावेळी तालुका कृषी अधिकारी वैभव विश्वे यांनी बीबीएफ तंत्रज्ञानाचे फायदे सविस्तरपणे स्पष्ट केले. सोयाबीन, बटाटा यांसारख्या पिकांसाठी हे तंत्रज्ञान अत्यंत उपयुक्त ठरत असून कमी पावसात जमिनीतील ओलावा टिकवून ठेवणे आणि अतिवृष्टीच्या वेळी अतिरिक्त पाण्याचा सुरक्षित निचरा करणे ही त्याची प्रमुख वैशिष्ट्ये असल्याचे त्यांनी सांगितले.

मागील हंगामात बीबीएफ तंत्रज्ञानाचा यशस्वी वापर केलेल्या प्रगतशील शेतकऱ्यांनी आपल्या अनुभवांचे कथन केले. या तंत्रज्ञानामुळे बियाण्यांची बचत, पिकांची जोमदार वाढ, काढणीतील सुलभता आणि उत्पादनवाढ साध्य झाल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच प्रतिकूल हवामानातही पिकांचे नुकसान कमी झाल्याचा अनुभव त्यांनी व्यक्त केला.

सहाय्यक कृषी अधिकारी किरण कानडे यांनी बीबीएफ यंत्राची ट्रॅक्टरला जोडणी, पेरणी प्रक्रिया, पेरणीतील अंतर, खत व्यवस्थापन आणि इतर तांत्रिक बाबींचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. यावेळी शेतकऱ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांचे तज्ज्ञांनी समाधानकारक निरसन केले.

खेड तालुक्यातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी आणि कृषी क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी बीबीएफ तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी अवलंब करावा, असे आवाहन कृषी विभागातर्फे करण्यात आले.

कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी शेतकरी, ट्रॅक्टरधारक आणि कृषी विभागाच्या कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. तालुका उपकृषी अधिकारी प्रवीण शिंदे यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाचा समारोप केला.

## युवकांच्या सहभागातून सक्षम महाराष्ट्र घडविण्याचा आमचा निर्धार : कृष्णराज महाडीक

### माऊलींच्या आशीर्वादाने आळंदीतून 'युवाशक्ती जागर यात्रा'चा शुभारंभ



आळंदी (दै. संध्या)

"श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पवित्र भूमीतून युवा शक्ती जागर यात्रेला प्रारंभ होत असल्याचा आनंद आहे. संत परंपरेने महाराष्ट्राला विचार व संस्कारांची दिशा दिली असून युवकांना विकास, संघटन आणि सामाजिक उत्तरदायित्वाशी जोडण्यासाठी ही यात्रा महत्त्वाची ठरेल," असे प्रतिपादन भारतीय जनता युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष कृष्णराज धनंजय महाडीक यांनी केले.

श्री क्षेत्र आळंदी येथे संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधीचे दर्शन घेऊन 'युवा शक्ती जागर यात्रा'च्या पुणे जिल्हा (उत्तर) दौऱ्याचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी कृष्णराज महाडीक यांच्या हस्ते माऊलींच्या चल पादुकांचे पूजन व अभिषेक करण्यात आला. यावेळी नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, मंडलाध्यक्ष वैजयंता उमरगेकर, संजय घुंडरे, उपनगराध्यक्षा सुजाता तापकीर, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष गणेश कवडे, प्रिया पवार, नगरसेवक दिनेश घुले, सोमनाथ कुऱ्हाडे, सचिन गिलबिले, सागर कुऱ्हाडे, रामचंद्र भोसले, गोविंद कुऱ्हाडे, नगरसेविका साक्षी कुऱ्हाडे, पुजा घुंडरे, माजी नगरसेविका सुनीता रंधवे, ज्ञानेश्वर रायकर, अनिकेत तापकीर, अ‍ॅड.आकाश जोशी, संकेत वाघमारे, माऊली बनसोडे, मनोहर दिवाणे तसेच भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यानंतर आळंदी देवस्थान येथे सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती घेऊन भाविकांसाठीच्या सुविधा व विकासकामांबाबत चर्चा करण्यात आली. देवस्थानचे विश्वस्त पुरुषोत्तम महाराज पाटील यांनी माहिती दिली. तसेच आळंदी नगरपरिषद येथे नगराध्यक्ष, उपनगराध्यक्षा, नगरसेवक व संबंधित पदाधिकाऱ्यांशी थेट संवाद साधत सुरू असलेल्या विकासकामांचा आढावा घेण्यात आला. भविष्यातील विकास आराखड्यावर चर्चा करून श्री क्षेत्र आळंदीच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक बाबींवर विचारविनिमय करण्यात आला. दौऱ्यादरम्यान श्री जोग महाराज वारकरी शिक्षण संस्थेला सदिच्छा भेट देऊन वारकरी विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यात आला.

## उरुळी कांचन येथील प्रस्तावित मेगा रेल्वे टर्मिनल रद्द

पुणे (दै. संध्या)

■ नवीन उरुळी नाशिक लोहमार्ग तयार करण्याची घोषणा

उरुळी कांचन येथील प्रस्तावित मेगा रेल्वे टर्मिनल रद्द झाला आहे. अशी घोषणा रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी नुकतीच पुण्यामध्ये केली. हा प्रकल्प आता पुणे-मिरज लोहमार्गावरील आळंदी म्हातोबा या ठिकाणी होणार असल्याची माहिती मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रकार परिषदेत दिली.

उरुळी कांचनमध्ये होणारा टर्मिनल पुण्यातील रेल्वे नेटवर्क वरील ताण कमी करणे, आणि प्रमुख औद्योगिक क्षेत्रांना जोडणे, या उद्देशाने उभारला जाणारा १०० हेक्टरवरील एक भव्य पायाभूत सुविधा प्रकल्प होता. हे टर्मिनल नवीन तळेगाव-उरुळी बायपास आणि पुणे-अहिल्यानगर रेल्वे कॉरिडॉरचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ होता.

उत्तर प्रदेश, बिहार आणि मध्य प्रदेश यांसारख्या राज्यांमधून येणाऱ्या लांब पल्ल्याच्या गाड्यांना सामावून घेण्यासाठी या विभागातील सर्वात मोठे टर्मिनल म्हणून याची रचना केली जात होती. हे टर्मिनल तळेगाव ते सोलापूर-पुणे रस्त्यापर्यंत (चाकण आणि वाघोली मार्गे) जाणाऱ्या पूर्णपणे नवीन ७५ किमी रेल्वे मार्गाला जोडले जाणारे होते.

## खालुंब्रे येथील जोपादेवी सोसायटीच्या चेअरमनपदी ईश्वर बोत्रे



चाकण (दै. संध्या)

खेड तालुक्यातील खालुंब्रे येथील श्री जोपादेवी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी येथील उद्योजक ईश्वर राणु बोत्रे यांची, तर उपाध्यक्षपदी भागुबाई दशरथ बोत्रे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. याप्रसंगी सोसायटीचे संचालक चंद्रकांत भिमराव तूळवे, शामराव सहादू बोत्रे, लंकाबाई बबन शिंदे, राजू महादू बोत्रे, राजू सयाजी बोत्रे, अमोल गुलाबराव पवार उपस्थित होते. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून रोहिदास गव्हाणे यांनी काम पाहिले. ईश्वर बोत्रे यांची सोसायटीच्या चेअरमनपदी निवड झाल्यानंतर कार्यकर्त्यांनी आनंदोत्सव साजरा केला. खालुंब्रे गावचे माजी उपसरपंच दिलीप बोत्रे यांच्या हस्ते नवनिर्वाचित चेअरमन ईश्वर बोत्रे व व्हाईस चेअरमन भागुबाई बोत्रे यांचा सन्मान करण्यात आला. ईश्वर बोत्रे यावेळी म्हणाले," सर्वांना बरोबर आणि विश्वासात घेऊन सोसायटीचे कामकाज पारदर्शकपणे सुरू ठेवणार आहे. गरजूंना आवश्यक असणारे कर्जवाटप केले जाणार असून, सोसायटीच्या माध्यमातून गावात लोकोपयोगी उपक्रम राबवले जाणार आहेत."

## एकत्र येऊन समाजोपयोगी कामे करण्याची गरज : प्रमोद रासकर



लोणी काळभोर (दै. संध्या)

शालेय शिक्षण संपवून ४० वर्षे झाल्यानंतर प्रत्येक जण आपापल्या आयुष्यात, व्यवसायात किंवा नोकरीत व्यस्त असतो. असे असतानाही आपल्या जन्मभूमीची, परिसराची आणि समाजाची नाळ तुटू न देता, एकत्र येऊन समाजोपयोगी काम करण्याचा उदात्त विचार करणे ही आजच्या काळाची मोठी गरज आहे असे प्रतिपादन वनविभागाचे वनपरिमंडळ अधिकारी प्रमोद रासकर यांनी केले. येथील पृथ्वीराज कपूर मेमोरियल हायस्कूलच्या १९८६ सालच्या इयत्ता दहावीच्या बॅचच्या वतीने 'समर्पण वृद्धाश्रम' (कवडीपाट, कदमवाकवस्ती) येथे बसवण्यात आलेल्या जलशुद्धीकरण यंत्रणेचे (आरओ वॉटर फिल्टर प्लांट) लोकार्पण रासकर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी हभप सुशील महाराज काळभोर, विशाल गुजर, पुणे बार असोसिएशनचे माजी सचिव अ‍ॅड. राहुल झेंडे, 'समर्पण'चे कार्याध्यक्ष राजेंद्र कांबळे, सखाराम घाडगे, डॉ लक्ष्मण मासाळ, ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र बापू काळभोर यांच्यासह १९८६ च्या बॅचचे विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रमोद रासकर पुढे म्हणाले आजचा हा सोहळा केवळ एका जलशुद्धीकरण यंत्रणेचे लोकार्पण करण्याचा सोहळा नसून, तो कृतज्ञता, सामाजिक बांधिलकी आणि आपल्या संस्कारांचा मेळावा आहे. पृथ्वीराज कपूर मेमोरियल हायस्कूलच्या १९८६ च्या बॅचचा हा उपक्रम मनाला कमालीचा आनंद आणि समाधान देणारा आहे.

आपण नेहमी म्हणतो 'पाणी हेच जीवन आहे', पण त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे शुद्ध पाणी हे 'आरोग्यदायी जीवन' आहे. या वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना शुद्ध आणि स्वच्छ पिण्याचे पाणी मिळावे, ही या बॅचची भावना अत्यंत पवित्र आहे. तुम्ही त्यांच्या आरोग्याची काळजी घेऊन एका प्रकारे ईश्वराचीच सेवा केली आहे. या उपक्रमातून आजच्या तरुण पिढीलाही समाजासाठी काहीतरी करण्याची नक्कीच प्रेरणा मिळेल.

यावेळी ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र बापू काळभोर, ज्येष्ठ शिक्षिका कल्पना बोरकर, सूर्यकांत गवळी आणि डॉ लक्ष्मण मासाळ यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजेंद्र बापू काळभोर यांनी केले, तर सूत्रसंचालन शाहीर महेश खुळपे यांनी केले.

## कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात संशोधन व कौशल्य विकासाची गरज

### डॉ. एम. जी. ताकवले : यादववाडी विद्यालयाच्या ३५ व्या वर्धापन दिनानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



पुणे (दै. संध्या)

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वेगाने बदलणाऱ्या युगात विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासाठी संशोधन, नवोपक्रम आणि कौशल्य विकासाला प्राधान्य देणे अत्यावश्यक आहे. जिज्ञासू वृत्ती, अभ्यासाची सवय आणि संशोधनाची आवड जोपासल्यास विद्यार्थ्यांचे भविष्य अधिक उज्वल होऊ शकते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एम. जी. ताकवले यांनी केले.

हरगुडे ग्रामविकास संस्थेच्या माध्यमिक विद्यालय, यादववाडीच्या ३५ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. यावेळी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या 'अग्नि' क्षेपणास्त्र प्रकल्पात मोलाचे योगदान देणारे ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. दिलीप देशमुख प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

डॉ. देशमुख यांनी विद्यार्थ्यांना विज्ञाननिष्ठ विचारसरणी, भारतीय संस्कृतीचे संवर्धन आणि समाजपरिवर्तनासाठी मोठी स्वप्ने पाहण्याचा संदेश दिला. सर आयझॅक न्यूटन, थॉमस अल्वा एडिसन, चार्ल्स डार्विन आणि पायथागोरस यांच्या प्रयोगशाळांना दिलेल्या भेटींचे अनुभव त्यांनी विद्यार्थ्यांसमोर उलगडले. तसेच स्टीफन हॉकिंग, एलन मस्क आणि निकोला टेस्ला यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन संशोधन क्षेत्रात नवे आयाम निर्माण करण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी एसएससी परीक्षेत विद्यालयातील प्रथम तीन क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांसह परिंचे केंद्रात प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या आदेश प्रकाश कुमकर यांचा विशेष गौरव करण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांना एकूण ५० हजार रुपयांची पारितोषिके प्रदान करण्यात आली.

#### श्री स्वामी बॅग्जकडून विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटप

सामाजिक बांधिलकी जपत श्री स्वामी बॅग्ज, पुणे यांच्या वतीने राहुल जगताप यांनी विद्यालयातील गरजू, होतकरू आणि गुणवंत विद्यार्थ्यांना ५० शालेय दप्तरांसह टिफिन बॅगचे मोफत वितरण केले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी दरवर्षी विविध स्वरूपात सहकार्य करणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थित मान्यवरांनी विशेष कौतुक केले.

कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष जाफर शेख, खजिनदार अविनाश ताकवले, सचिव मोहन ताकवले, संचालक विवेकानंद ताकवले, कमलाकर ताकवले, ज्ञानेश्वर यादव यांच्यासह ग्रामस्थ, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक दिलीप नेवसे यांनी केले. सूत्रसंचालन अब्दुलगनी तांबोळी व हनुमंत निगडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन दीपक भोसले यांनी मानले.

